*For Private Circulation Only*

# Study Circle Career Development Institute

## महाराष्ट्र अराजपत्रित सेवा (गट ब)/(गट क) मुख्य परीक्षा २०२३

## पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी

## (५) मराठी उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा २०२३

## मराठी उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे घटकावर प्रश्न असणाऱ्या परीक्षा

१) सहायक रासायनिक विश्लेषक चाळणी परीक्षा, १९ जानेवारी २०२३
२) दंत शल्यचिकित्सक चाळणी परीक्षा, २०२३
३) मुख्य प्रशासकीय अधिकारी चाळणी परीक्षा २०२३
४) सहायक मत्स्य आयुक्त चाळणी परीक्षा २०२३
**५) राज्यसेवा मुख्यपरीक्षा पेपर्स १ ते ४, २०२३**
**६) महाराष्ट्र गट क मुख्य परीक्षा पेपर १, २००३**
७) फार्मासिस्ट, वैद्यकीय महविद्यालये चाळणी परीक्षा २०२३
८) सांख्यिकी अधिकारी, सार्वजनिक आरोग्य चाळणी परीक्षा २०२३
९) कायदा अधिकारी, नगरनियोजन चाळणी परीक्षा २०१३
१०) सहायक संचालक,नगरनियोजन चाळणी परीक्षा २०२३
११) सहायक कायदेशीर सल्लागार/अव्वर सचिव, नगरनियोजन चाळणी परीक्षा , २०१३
१२) नगरनियोजन अधिकारी चाळणी परीक्षा २०२३
१३) लिपिक टंकलेखक (मुख्य) परीक्षा, १२ फेब्रुवारी २०२३
१४) दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क (मुख्य) परीक्षा २०२३
१५) कर सहायक (मुख्य परीक्षा) ४ मार्च २०२३
१६) उद्योग निरीक्षक, गट क (मुख्य) परीक्षा, ११ मार्च २०२३
१७) सहायक आयुक्त (औषधे ) चाळणी परीक्षा, १७ मार्च २०२३
१८) सहाय्यक (विधी) चाळणी परीक्षा, १७ मार्च २०२३
१९) कनिष्ठ भूवैज्ञानिक चाळणी परीक्षा, १७ मार्च २०२३
२०) कार्यकारी अभियंता (विद्युत) चाळणी परीक्षा, २० मार्च २०२३
२१) उपअभियंता (विद्युत–यांत्रिकी) चाळणी परीक्षा, २० मार्च २०२३
२२) महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा, १६ एप्रिल २०२३
२३) महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व क सेवा, संयुक्त पूर्वपरीक्षा, ३० एप्रिल २०२३
२४) महाराष्ट्र अभियांत्रिकी (सिव्हिल) मुख्य परीक्षा, २३ एप्रिल २०२३
२५) उपसंचालक आरोग्यसेवा चाळणी परीक्षा, १२ मे २०२३
२६) महाराष्ट्र अभियांत्रिकी (विद्युत) मुख्य परीक्षा, १३ मे २०२३
२७) महाराष्ट्र कृषीसेवा मुख्य परीक्षा, १३ मे २०२३
२८) उपसंचालक औद्योगिक सुरक्षा चाळणी परीक्षा, १६ मे २०२३
**२९) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा, ४ जून २०२३**
३०) वैद्यकीय अधिकारी चाळणी परीक्षा, ८ जुलै २०२३

*For Private Circulation Only*

महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क) २०२३

## पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी

# (५) मराठी उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब) / (गट क) २०२३

## पेपर क्रमांक –१ : मराठी व इंग्रजी

### (१) मराठी भाषा (५०)

(१) सर्वसामान्य शब्दसंग्रह / १५
(२) वाक्यरचना / १३
(३) व्याकरण / १२
(४) म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग) / ५
(५) उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे / ५

### (२) इंग्रजी भाषा / ५०

**(6) CommonVocabualry / 10**
**(7) SentenceStructure / 20**
**(8) Grammar /10**
**(9) Use of Idioms and Phrases / 5**
**(10) Comprehension / 5**

## पेपर क्रमांक – २ : सामान्य अध्ययन व बुद्धिमापन चाचणी

१) सामान्य बुद्धिमापन व आकलन / १०
२) चालू घडामोडी – जागतिक तसेच महाराष्ट्रासह भारतातील / १०
३) अंकगणित आणि सांख्यिकी / १०
४) अ) माहिती अधिकार अधिनियम, २००५ / ५
ब) महाराष्ट्र लोकसेवा हक्क, २०१५ / ५
५) भारतीय संघराज्य व्यवस्था, राज्यघटना, स्थानिक स्वराज्य व्यवस्था, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, विधीमंडळ / १५
६) अ) भारताचा व महाराष्ट्राचा भूगोल / १०
ब) पर्यावरण / ५
७) सामान्य विज्ञान व तंत्रज्ञान / १५ –
अ) भौतिकशास्त्र (फिजिक्स) / २
ब) रसायनशास्त्र (केमिस्ट्री) / २
क) प्राणीशास्त्र (झूलॉजी) / २
ड) वनस्पतिशास्त्र (बॉटनी) / २
इ) दूरसंवेदन, हवाई व ड्रोन छायाचित्रण, भौगोलिक माहिती प्रणाली व त्याचे उपयोजन / २
फ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान / ५
८) अर्थव्यवस्था व नियोजन, विकास विषयक अर्थशास्त्र आणि कृषी / १५
१) समग्रलक्षी अर्थशास्त्र, विकास विषयक अर्थशास्त्र / ६
२) भारतीय अर्थव्यवस्था आणि कृषी / ९

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)
# Maharashtra Non Gazzeted Services Main Examination (Group B)

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन**

**पेपर क्र.-१ - २०० गुण**
**पेपर क्र.-२ - २०० गुण**
**एकूण - ४०० गुण**

**शारीरिक चाचणी व मुलाखत - केवळ पोलीस उप निरीक्षक पदाकरीता**
**(शारीरिक चाचणी - १०० गुण, मुलाखत - ४० गुण)**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (सांकेतांक १०६२) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (सांकेतांक १०६३) | सामान्य अध्ययन व बुद्धिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

## -: अभ्यासक्रम :-

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | **मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट क)
## (सहायक मोटार वाहन निरीक्षक पद वगळून अन्य पदांकरीता)
# Maharashtra Non Gazzeted Services Main Examination (Group C)
## (All posts excluding Assistant Motor Vehicle Inspector Post)

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन**

**पेपर क्र.-१ - २०० गुण**
**पेपर क्र.-२ - २०० गुण**
**एकूण - ४०० गुण**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (सांकेतांक १०६४) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (सांकेतांक १०६५) | सामान्य अध्ययन व बुद्धिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

## -: अभ्यासक्रम :-

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | **मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |

## महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क) २०२३

# पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी सविस्तर अभ्यासक्रम

## (१) मराठी (५०)

### (१) सर्वसामान्य शब्दसंग्रह /१५

१) समानार्थी शब्द–विरुद्धार्थी शब्द
२) शब्दार्थ–संज्ञांचे अर्थ
३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द
४) शब्दव्युत्पत्ती – तत्सम / तद्भव
५) देशी / भारतीय / परभाषेतील शब्द
६) शब्दसिद्धी – सिद्ध शब्द / धातू
७) उपसर्गघटित शब्द
८) प्रत्ययसाधित शब्द – कृदंत – धातू साधित / तद्धित – शब्द साधित
९) अभ्यस्त शब्द – पूर्णाभ्यस्त / अंशाभ्यस्त / अनुकरण वाचक
१०) अलंकारिक / सामासिक / ग्रामीण व नागरी शब्द
११) शब्दार्थ न जुळणारा शब्द, पर्यायी शब्द / पर्यायी नसलेला शब्द
१२) विविधअर्थी एक शब्द
१३) संदर्भ शब्द रिकाम्या जागी निवडणे
१४) शब्दांचे शुद्धलेखन – शब्दाचा प्रकार, जोडशब्द
१५) लिपी, शब्दशक्ती/शब्दांचे काव्यगुण

### (२) वाक्यरचना/१३

१) वाक्याचे पृथक्करण – उद्देश व उद्देशविस्तार, विधेय व विधेयविस्तार
२) वाक्य संश्लेषण व वाक्यनिर्मिती
३) वाक्यातील कर्ता व कर्म
४) कर्तरी प्रयोग, कर्मणी प्रयोग
५) भावे प्रयोग, नवीन प्रकार

*** वाक्यरचनेनुसार प्रकार व रूपांतर**

६) केवलवाक्य, मुख्य आणि गौण वाक्ये
७) संयुक्तवाक्य व वाक्य रूपांतर
८) मिश्रवाक्य व वाक्य रूपांतर

*** अर्थावरून प्रकार व वाक्य रूपांतर**

९) होकारार्थी, नकारार्थी व वाक्य रूपांतर
१०) प्रश्नार्थक व वाक्य रूपांतर
११) उद्गारवाचक, आज्ञार्थी व वाक्य रूपांतर
१२) वाक्यातील काळ आणि आख्यात
१३) योग्य विरामचिन्हांचा वापर

## (३) व्याकरण/१२

१) वर्णाक्षरे व शब्दांच्या जाती
  १) वर्णाक्षर व मूलध्वनी
  २) स्वर
  ३) व्यंजन
  ४) अनुनासिके
  ५) वर्णरचना
  ६) जोडाक्षर
  ७) शब्दांच्या जाती
२) नाम व नामाचे प्रकार
३) सर्वनाम
४) विशेषण
५) क्रियापदांचे प्रकार, रूप व धातुसाधिते
६) क्रियाविशेषण व शब्दयोगी अव्यय
७) उभयान्वयी व केवलप्रयोगी अव्यय
८) सामान्यरूप व विभक्ती
९) लिंग व वचन
१०) संधी व समास
११) अलंकार, वृत्ते, पद्यरचना – काव्य/ओव्या
१२) वाङ्मयीन इतिहास व भाषिक सामान्यज्ञान

## (४) म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग)/५

४१) म्हणीचा योग्य अर्थ
४२) वाक्प्रचाराचा योग्य अर्थ
४३) योग्य अर्थाची म्हण/पर्यायी म्हण निवडणे
४४) पर्यायी वाक्प्रचार
४५) म्हणीचा/वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग

## (५) उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे/५

४६) उतारा क्र.१ प्रश्न क्र.१
४७) उतारा क्र.१ प्रश्न क्र.२
४८) उतारा क्र.१ प्रश्न क्र.३
४९) उतारा क्र.१ प्रश्न क्र.४
५०) उतारा क्र.१ प्रश्न क्र.५

# (२) इंग्रजी /५०

## (6) CommonVocabualry /10

51) Synonyms / Homonym
52) Antonyms
53) One Word substitution
54) Meaning / Wrong meaning of words, underlined words
55) Correct spelling
56) Names for groups/collection
57) Use of correct word
58) Word formation /Construction / building
59) Confusing words & Full form
60) Fill in the blanks

## (7) SentenceStructure /20

61) Types of sentences - structure
62) Types of sentences - meaning
63) Types of clauses
64) Question tags and Interrogative sentences
65) Grammatically Correct sentence
66) Grammatical error part
67) Punctuation
68) Direct - Indirect Speech
69) Active & Passive Voice
70) Degrees
71) Transformation
72) Completion of clauses
73) Meaning of sentence
74) Sentence completion
75) Sentence construction
76) Types of sentences - structure/meaning
77) Types of clauses
78) Grammatically Correct /error part/Punctuation
79) Direct - Indirect Speech
80) Active & Passive Voice

Study CIRCLE

## (8) Grammar /10

81) Types and use of Noun, Pronouns
82) Types and use of correct Adjectives
83) Types and use of Verbs, Modals
84) Types of Tenses
85) Use of correct Adverb
86) Use of correct Preposition
87) Use of correct Conjunction and Interjection
88) Use of Articles
89) Singular & Plural, Gender
90) Figure of Speech

## (9) Use of Idioms and Phrases / 5

91) Correct meaning of a phrase
92) Correct meaning of an idiom
93) Correct use of phrase
94) Correct use of an idiom
95) Gerundial phrase, Substitution of phrase / idiom

## (10) Comprehension / 5

96) Passage no.2, Q.no.1
97) Passage no.2, Q.no.2
98) Passage no.2, Q.no.3
99) Passage no.2, Q.no.4
100) Passage no.2, Q.no.5

## महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क) २०२३

## पेपर क्रमांक –१ : मराठी व इंग्रजी

# (५) मराठी उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे

✲ **पुढील उतारा वाचून प्र. क्र. १ ते ५ या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

एक असामान्य कलाकृती वाचण्याचा सर्वात मोठा बहुमान बहुधा हाच असतो की, आम्ही आमच्यातच दबलेल्या, विस्मृतीत गेलेल्या आवाजांना ऐकायला लागतो ज्यांचा आभासदेखील आम्हाला कधी जाणवला नव्हता. आम्ही एखादी कलाकृती वाचतो तेव्हा इतरांच्या आत्म्यांमध्ये आम्ही प्रवेश करत नाही तर इतरांना आमच्यात प्रवेश करू देतो. शेक्सपिअरच्या ऑथेल्लो किंवा हॅम्लेट, टॉलस्टॉयचा इवान इलीच, प्रेमचंदांचा होरी किंवा जैनेंद्रकुमारांची मृणाल आमच्या आत आहे. हजारो वेळ ऐकलेली एक गोष्ट पुन्हा पुन्हा आठरते की, एखादी कलाकृती आमच्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर कदाचित देऊ शकणार नाही, पण आमचा प्रश्न अधिक तीक्ष्ण आणि टोकदार करण्याचे कार्य ती निश्चित करते. वाचकाला एखादी कलाकृती वाचून कुठेतरी वेगळे व्हायचे नसते तर आणखी स्पष्टपणे स्वतःला शोधण्यासाठी तो ती कलाकृती वाचत असतो.

इथे आम्ही कधीही न संपणारा शोध घेऊ शकतो. वाचनाच्या या अनुभवाने कितीतरी असंबद्ध आणि दूरवर विखुरलेल्या वस्तूंशी आम्हाला जोडलंय. आम्ही या अनुभवात एकाच वेळी स्थिर, भटके, तर एक मनोवैज्ञानिक, तत्त्वज्ञ, इतिहासकार, सौंदर्य उपासक आणि अराजकतेने व्यापलेले आणि थोडेसे भावनिक झालेले असतो.

या पुस्तकांच्या जगात शिरल्यावर आम्ही बालपणी हरवलेल्या निष्पापतेला, आपल्या अनामिका शंका आणि स्वप्नांना, संभ्रमांना, शहरांना, जुन्या दिवसांना, प्रेमाच्या अनिवार्यतेला आणि विश्रांतीच्या नैसर्गिकतेला, पुन्हा एकवार अनुभवू शकतो. ते सगळे जे याच जीवनात घडले आणि याच तळहातांमधून निसटून गेले.

ज्या काळातून आम्ही मार्गक्रमण करतोय त्या काळातच 'स्थलांतर', 'विस्थापन' हे सर्वात मोठे 'रूपक' आहे. माणसाचे त्याच्या स्वतःच्या भूतकाळापासून मुळांपासून परंपरा, परिवेश, भाषा, संस्कृती, नातीगोती, गल्ल्या–बोळातून आणि शहरांतून विस्थापन होतेय आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, त्याचे त्याच्या स्मृतींपासून विस्थापन होतेय. आमच्या समकालीन अवस्थेत प्रत्येक असामान्य कलाकृतीमध्ये लेखक प्रामुख्याने एक शरणार्थी आहे. तो दारोदार भटकणारा एक निर्वासित आहे. जो आपल्या संदुकांसह, सामानासह खूप गल्लीबोळातून/शहरांतून आणि काळाला घेऊन जीवनमूल्यांना आणि असंख्य विश्वासांना आपल्या खांद्यावर वाहून नेतोय. या सगळ्या गोष्टी त्याला एक सजीव आणि स्पंदनशील माणसाच्या रूपात व्यक्त करत आल्या आहेत. सगळीकडे असत्य, विकृती आणि तोडफोडीच्या विध्वंसक परिस्थितीत ती आपले हे सामान वाचवू पाहातोय. इथल्या शक्तिकेंद्रांचे प्रचारतंत्र एवढे भयावह आहे की ते नाहीशा होणाऱ्या सर्व गोष्टींना एका सहजप्रक्रियेत रूपांतरित करत आहे. प्रत्येक मूलभूत संकट आमच्यासाठी केवळ एक 'वस्तुस्थिती' होऊन जातेय. आम्ही सारे काही विस्मृतीत घालवण्यासाठी शापीत झालो आहोत. अशा परिस्थितीत जर एखादी कलाकृती आमच्या कुठल्याशा राहून गेलेल्या सामानाकडे, हरवलेल्या वस्तूंकडे निर्देश करत असेल तर विजेच्या कल्लोळासारखा हा अनुभव असतो आणि आत्तापर्यंत या जगाच्या पूर्णत्वाचे जे चित्र आम्हाला दाखवले जात होते ते किती खोटे आणि विश्वासघातकी होते याची कल्पना येते. एक असामान्य कलाकृती आम्हाला ढासळलेल्या भग्नावशेषातून सत्याची पुनर्रचना करण्याचे प्रोत्साहन देते.

१) प्रस्तुत उताऱ्याची मध्यवर्ती कल्पना कोणती?

१) सांस्कृतिक परिवर्तन वा विस्थापन
२) संस्कृतीचे संरक्षण करणे
३) अलौकिक कलाकृतीतून होणारे संस्कार
४) अलौकिक कलाकृतीचे परीक्षण

२) समकालीन स्थित्यंतराच्या काळात लेखक कोणती जबाबदारी पार पाडत आहेत?
१) स्थलांतराचे चित्रण करणे २) संस्कृतीचे संरक्षण करणे
३) न संपणारा शोध घेणे ४) स्वशोध घेणे

३) स्थलांतर व विस्थापनाच्या काळात समाजावर सर्वात मोठा कोणता आघात होत आहे?
१) सत्याची पुनर्रचना होण्यातला अडसर २) विश्वासघात
३) वाचनसंस्कृतीचा ऱ्हास ४) सांस्कृतिक विस्मृती

४) प्रस्तुत उताऱ्यातील भाषाशैलीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे?
१) विचारप्रधान २) आस्वादप्रधान ३) कल्पनाप्रधान ४) बोलीप्रधान

५) एखाद्या असामान्य साहित्यकृतीच्या वाचनाचे प्रयोजन कोणते असते?
a) पात्रांच्या प्रवृत्तींचा शोध b) परकाया प्रवेश c) आत्मशोध d) आस्वाद
**पर्यायी उत्तरे** :
१) (a) व (c) बरोबर २) (b) व (c) बरोबर ३) फक्त (c) बरोबर ४) (a), (b), (c) बरोबर

* **पुढील उतारा वाचून त्यावर आधारित असलेले प्रश्न क्रमांक ६ ते १० ची उत्तरे लिहा.**

मी सतत चिंतन करीत असतो, गाभा शोधीत असतो तेव्हा मला जाणवते, युवासागराला आपल्या भव्य शक्तीचे भान अद्याप झालेले नाही! या ढगांना आपल्या लपलेल्या विद्युल्लतेचा पत्ता नाही, अंदाज नाही. या कृष्ण–मेघांना कळत नाही की करंगळीवर क्षितिज पेलणारा कृष्णसुद्धा याच वयाचा होता. याहूनही लहान होता ! ज्याचे ध्यान आपल्या ध्येयाशी एकटक निगडित झाले आहे तो युवा !

दररोज मी स्वतःला शोधीत असतो. कधीकधी मी एकाकी असतो. जखम दिसत नाही, पण घायाळ असतो. अशा एकाकीपणात मला अंकुर फुटतात. मी स्वतःविरुद्ध माझ्यापाशीच तक्रार करीत असतो. युवा तो असतो, जो इतरांविरुद्ध नव्हे, तर स्वतःविरुद्ध स्वतःजवळच तक्रारी मांडीत असतो. मी ते दुःख पाहिले. माझ्याजवळ इतकी ताकद होती. मग मी पुढे का सरसावलो नाही ? माझ्यात करुणेची, प्रेमाची शक्ती होती तर काल मी पळून का गेलो ? का त्या प्रसंगाला सामोरा गेलो नाही ? ही अस्पृश्यता, विषमता, अज्ञान, दारिद्र्य, लाचारी मी सहन करू शकत नाही. मग जीवनाच्या रणांगणाकडे जाताना माझी पावले का अशी रेंगाळतात ? कृतीच्या क्षणी मी का माघारी वळतो ? जो लाचारीने शरमिंदा होतो, तो युवा. आपल्या या लाचारीवर तो एकान्तात अश्रू ढाळतो. ते क्षण त्याला बळ देत असतात, अगतिकतेच्या पलीकडे झेपावण्याचे, उषःकालापूर्वी घनदाट अंधकार जरूर असतो, पण प्रभातकाल सन्निध असल्याची चाहूल अंधार देत असतो. युवा तो, जो जगातले अंधारलेले कोपरे उजळवतो. त्याचबरोबर आपल्या हृदयातला कोपराही दीप्तिमान करतो. परिस्थितीचे लगान खेचून जो तिला काब ूत आणतो तो युवा. (पण साहसालाही एक अट असते. लक्ष्मणरेषा आखण्याची. तरुणाईने आपल्या जीवनात ही लक्ष्मणरेषा आखून घेतली नाही म्हणून ही शक्ती विध्वंसनात, उलथापालथीत कामी येत आहे. आपल्या युवा शक्तीला त्यांनी योग्य रस्त्यावर हाकारले नाही. कधी छोट्या छोट्या प्रकल्पात, कार्यक्रमात, इवल्याशा क्रांतीत ती तो उधळून टाकतो. पण, चहाच्या किटलीतल्या वाफेने जनतेचे रथ चालत नसतात !

आजची युवा पिढी आहे केवळ स्पेक्टेटर जनरेशन प्रेक्षक पिढी, देखू पिढी ! ती केवळ पाहते आहे – कुठे कशी क्रांती कधई घडून येते. जेथे बांधून घ्यावे लागेल, कार्यमग्न व्हावे लागेल असे राजकारण तिला नको ! कार्यक्रम असा असावआ की ज्यात बांधिलकी (कमिटमेंट) सुद्धा असावी आणि सहभागही (इनव्हॉलमेंट) असावा, जेव्हा कुणी माझ्याकडे स्वाक्षरी मागायला येतो तेव्हा मी हैराण होतो. युवक तो आहे, जो इतरांपासून संदेश या स्वाक्षरी मागीत नसतो. तो घटनांवर आणि क्षणावर आपली स्वाक्षरी उमटवितो !

आता काय आहे, काय नाही याचे चऱ्हाट आणि रडगाणे बंद झाले पाहिजे. ती पिढी अशी आहे, हा धर्म असा आहे, सोडून द्या या गोष्टी. धर्माने दुनियेचे भले होईल यावर भरोसा ठेवायची तुमच्यावर कुणी सक्ती तर नाही ना केली ? आपसात वैर करावे असे धर्म सांगत नाही; पण त्याच्याच नावावर झगडे होत आहेत.

६) प्रस्तुत उताऱ्यासाठी अधिक योग्य शीर्षक कोणते ?

१) जीवनाचे रणांगण
२) युवकाची बांधिलकी
३) युवा जीवनाला समाजाचे अडथळे
४) युवासागर

७) तरुणांची शक्ती कोमत्या कार्यात वाया जात आहे ?

a) विधायक कार्यात
b) विध्वंसनात व उलथापालथीत
c) अंधारलेले कोपरे उजळण्यात
d) कृतीच्या क्षणी माघारी वळण्यात

**पर्यायी उत्तर :**

१) फक्त (a) व (b) बरोबर
२) फक्त (b) व (c) बरोबर
३) फक्त (c) व (d) बरोबर
४) फक्त (b) व (d) बरोबर

८) युवाशक्तीची लक्षणे कोणती ?

a) परिस्थितीचे लगाम खेचून काबूत आणणारा
b) लाचारीने शरमिंदा न होणारा
c) प्रसंगांना सामोरे जाणारा
d) करुणेची, प्रेमाची शक्ती असणारा

**पर्यायी उत्तर :**

१) (a), (b), (c) सत्य
२) (b), (c), (d) सत्य
३) (c), (d), (a) सत्य
४) वरील सर्व सत्य

९) आजच्या युवा पीढीतील दोषस्थळे सांगा.

a) प्रेक्षक पीढी व दुसऱ्यांची तक्रार करणारे.
b) बांधिलकी नसलेला व दुःखी
c) सहभाग नसणारे व समस्यांपासून पळणारे.
d) घटनांवर व क्षणांवर स्वाक्षरी न उमटविणारा.

**पर्यायी उत्तर :**

१) फक्त (a), (b), (c) बरोबर
२) फक्त (c), (d), (a) बरोबर
३) फक्त (b), (c), (d) बरोबर
४) वरील सर्व बरोबर

१०) युवा कुणाला म्हणावे ?

१) एकाकी व तरुण असतो त्याला
२) जगाचे भान असलेला
३) आपल्या भव्य शक्तीचे भान झालेला
४) वयाच्या २५ वर्षापर्यंतच्या तरुणाला

*** खालील उतारा वाचून प्रश्न क्र. ११ ते १५ ची उत्तरे द्या.**

शब्द हा माझ्या अखंड कुतूहलाचा, आवडीचा आणि अभ्यासाचाही विषय आहे. गेल्या काही दिवसांत शब्दांच्या संदर्भात मला काही मजेदार अनुभव आले. तसे तर ते नेहमी येतात; पण का कोण जाणे, या खेपेला मला ते विशेष ठळकपणे जाणवले. गंमत म्हणजे हे सारे शब्द एकाक्षरी आहेत. लिहिण्यास, बोलण्यात, जाहीर वक्तृत्वापासून तो एकांतातील भाव निवेदनापर्यंत सर्वत्र आपण शब्दांचाच वापर करतो; पण यापैकी बहुतेक शब्द आकाराने मोठ, गुंतागुंतीचे, जड किंवा संदिग्ध असतात. माणसे भडाभडा बोलतात. अनावरपण लिहितात. आपण त्याला '' शब्दबंबाळ '' हे विशेषण लावतो; पण साधा एक अक्षराचा शब्ददेखील केवढा गहन आशय व्यक्त करू शकतो, हे अगदी अलीकडे वेगवेगळ्या घटनांनी माझ्या निदर्शनाला आणून दिले.

माझ्या भाचीची मुलगी. माझी छोटी नात. वय तीन–साडेतीन वर्षे. ती मराठी छान बोलते. वयाच्या मानाने अर्थपूर्ण आणि अगदी ठसकेबाज. हल्ली तिला एक शब्द सापडला आहे. तो म्हणजे ''का ? ''ती सारखे प्रश्न विचारत असते. मी कोणतेही वाक्य उच्चारले, म्हणजे ''मला आता काम आहे '', मी चहा पिणार आहे '', ''कावळा उडून आपल्या घरी गेला '', ''साखर फार खाऊ नये '' यांतले काहीही, तरी तिचा प्रश्न ठरलेला असतो ''का ? '' मी तात्पुरते काहीतरी उत्तर देऊन तिला गप्प बसवते; पण आपल्या उत्तराचा आवाका किती मर्यादित आहे आणि काही प्रश्नांना उत्तरेच कशी नसतात, हे त्याचवेळी मला उमगते आणि मी फार अस्वस्थ होऊन जाते. छोटीच्या त्या एकाक्षरी प्रश्नात जगातल्या साऱ्या जिज्ञासेचे, अनुभवाचे, ज्ञानाचे आणि उत्कट जाणिवेचे मूळ सामावले आहे, याचा मला साक्षात्कार होतो. जगाच्या इतिहासात कोणाला तरी, केव्ही तरी, कशाच्या तरी संदर्भात ''का ? '' असा प्रश्न विचारावासा वाटला. त्यातून शास्त्रे निर्माण झाली. वैज्ञानिक शोध लागले. आध्यात्मिक बोध झाला. सुंदर काव्ये, कलाकृती स्फुरल्या. हा ''का ? '' जर आपण गमावून बसलो तरी सारी प्रगतीच थांबेल.

आपण नेहमी वापरतो तो 'वा !' शब्द सकृतदर्शनी तो कौतुकाचा उद्गार वाटतो; पण जरा खोलवर विचार केला तर तो दिसतो तितका सोज्वळ नाही. चांगलाच लबाड आहे, हे ध्यानात येते. कोणी नवी खरेदी दाखवते, कोणी लेख किंवा कविता वाचून त्यावरची प्रतिक्रिया विचारते, कोणी लेकीचे गाणे ऐकवते, तर कोणी स्वकृत पाकसिद्धी खाऊ घालते. आणि आपण मनातले भाव लपवत, येणारी जांभई आवरत तोंडदेखले 'वा!' म्हणत असतो. तो 'वा !' शब्द कंटाळा, नाराजी, उपेक्षा अशा कितीतरी भावना सूचित करतो सभ्यता सुसंस्कृतता, प्रेमापोटी पडणारी भीड अशा किती अडचणी आपल्या वाटेत उभ्या असतात आणि त्या आपल्याला कौतुकाची दाद द्यायला लावून 'वा!' म्हणणे भाग.

'छे!' हाही असाच एकाक्षरी; परंतु अर्थाचे डोंगर पोटात सामावणारा शब्द. आत्यंतिक आश्चर्यापासून आत्यंतिक कृतज्ञतेपर्यंत, आत्यंतिक आनंदापासून तो पराकाष्ठेच्या तुच्छतेपर्यंत कितीतरी परस्परविरोधी प्रतिक्रिया या एकाच एकाक्षरी उद्गारातून आपण प्रकट करत असतो. 'परवा भीमसेनजींची मैफल ऐकली. छे! कमाल केली पंडितजींनी त्या दिवशी.' या वाक्यतला
'छे!'कौतुकास्पद दाखवतो 'छे!' कसल घाणेरडं पिक्चर दाखवलंस तू मला. वैताग आला ते बघताना!' या वाक्यातला 'छे!' तुच्छता, तिरस्कार यांचा सूचक असतो. 'छे!' आम्ही का ती मुलगी पसंत करणार आमच्या मुलासाठी? काहीतरीच काय?' या वाक्यातला 'छे!' बोलणाराच्या किंवा बोलणारणीच्या अहंकारी आढ्यतेमधून उमटलेला असतो. 'छे!''छे!! कहर झाला अगदी! हसून हसून माझं पोट दुखायला लागलं,' ही एखाद्या सुंदर, विनोद नाटकाबद्दलची उत्स्फूर्त प्रतिक्रिया असते.

असे कितीतरी एकाक्षरी शब्द 'हं', 'रे', 'हो', 'छी' हेही त्याच्याच मालिकेतले. मात्र, या शब्दांच्या उच्चारा बरोबर स्वरांचा चढउतार, त्यातला सूक्ष्म फरक, चेहऱ्यावरचे भाव हे ध्यानी घेतले नाहीत, तर त्यांचा खरा अर्थ समजणारच नाही.

११) जगातील साऱ्या जिज्ञासेचे, ज्ञानाचे आणि उत्कट जाणिवेचे मूळ 'का ?' या एका शब्दात सामावले आहे. कारण
अ) 'का ?' शब्द नसता तर सारी प्रगती झपाट्याने झाली असती.
ब) 'का ?' ची भाषा कधी कधी लहान–थोर सर्वांना उमगत नाही.
क)'का ?' अर्थहीन शब्द आहे.
ड) 'का ?' चा अर्थपूर्ण आवाका मोठा आहे.
**पर्यायी उत्तरे :**
१) अ फक्त    २) ब आणि ड फक्त    ३) क आणि अ फक्त    ४) क फक्त

१२) आपण दैनंदिन जीवनात वावरताना इतरांचे कौतुक करण्यासाठी 'वा!' असा शब्द वापरतो; पण तो इतका सोज्वळ नाही. कारण.
अ) त्यामध्ये आपल्या मनातून व्यक्त होणारे खरे भाव लपवलेले नसतात.
ब) त्यातून मनातील व्यक्त होणाऱ्या भावना ह्या अनेकवेळा नाराजी, उपेक्षा ह्या पद्धतीने सूचित होत नाहीत.
क) जीवलगांच्या प्रेमापोटी सभ्यता, सुसंस्कृतता इत्यादी भीड घालण्याच्या अडचणीमुळे 'वा!' म्हणणे भाग पडते.
ड) सकृतदर्शनी' 'वा!' कौतुकाचा उद्गार वाटत नाही.
**पर्यायी उत्तरे :**
१) अ आणि क फक्त    २) ब आणि ड फक्त    ३) ड फक्त    ४) क फक्त

१३) जगातील नवनिर्मितीच्या इतिहासासंदर्भात केव्हा तरी, कोणाला तरी 'का ?' असा प्रश्न विचारावासा वाटला. कारण

अ) शास्त्रे कशी निर्माण होतात हे समजण्यासाठी

ब) जगातील सर्व ज्ञानाचा साक्षात्कार झाला होता म्हणून

क) जिज्ञासा, अनुभव आणि ज्ञान यांचे मूळ सापडत नव्हते म्हणून

ड) कवीला सुंदर काव्ये, कलाकृती कशा पद्धतीने स्फूरतात हे कळण्यासाठी

**पर्यायी उत्तरे :**

१) ब फक्त बरोबर   २) अ आणि ड बरोबर   ३) अ, क, ड बरोबर   ४) क आणि ड बरोबर

१४) 'छे !' हा शब्द अर्थाचे डोंगर पोटात सामावणारा आहे. कारण

अ) त्यामध्ये सुंदर दिसणाऱ्या व्यक्ती, वस्तू वा कलाकृतीबद्दलची ती एक उत्स्फूर्त प्रतिक्रिया नसते.

ब) आश्चर्यापासून कृतज्ञतेपर्यंत अशा परस्पर विरोधी अर्थाच्या प्रतिक्रिया त्यात सामावलेल्या असतात.

क) कधी कधी ते बोलणाऱ्याच्या अहंकारी आढ्यतेमधून निर्माण झालेला नसतो.

ड) त्यामध्ये सूचकता अर्थात व्यंग्यार्थ असतो.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ बरोबर   २) ड बरोबर   ३) क आणि ड बरोबर   ४) ब आणि ड बरोबर

१५) खालील शब्द व त्या अनुषंगाने व्यक्त होणारे अर्थविशेष यांच्या जोड्या लावा.

| **शब्द** | **अर्थविशेष** |
|---|---|
| अ) 'का ?' एकाक्षर | i) विशेषण |
| ब) शब्दबंबाळ | ii) लबाडशब्द |
| क) 'वा !' | iii) गहन आशय |
| ड) 'हं, 'रे', 'हो', 'छी', 'छे' | iv) परस्पर विरोधी प्रतिक्रिया उद्गारणारा |
| | v) एकाक्षरी मालिका |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(अ)** | **(ब)** | **(क)** | **(ड)** | **(इ)** |
|---|---|---|---|---|---|
| १) | (iii) | (v) | (ii) | (iv) | (i) |
| २) | (ii) | (iv) | (i) | (v) | (iii) |
| ३) | (iii) | (i) | (ii) | (v) | (iv) |
| ४) | (iv) | (ii) | (iii) | (i) | (v) |

✻ **खालील उतारा वाचा व त्यावरील प्र. क्र. १६ ते प्र. क्र. २० ची उत्तरे द्या.**

आपला समाज हा स्थितिप्रिय असल्याने त्यात परिवर्तनवादी शक्ती थोड्या आहेत, आणि त्यातही पुन्हा त्या विविध प्रवाह व संघटना यांमधून इतस्ततः विखुरलेल्या आहेत. समाजपरिवर्तनासाठी होणारा संघर्ष हा बहुतांशी विषय स्वरूपाचा असतो. परिवर्तनवादी प्रवाहांचा पक्ष सामाजिक न्यायाचा आहे; मानवाच्या प्रतिष्ठेचा आहे. बाह्य परिस्थिती प्रतिकूल असली तरी काळाचा प्रवाह त्यांना अनुकूल आहे. पण परिवर्तनाला विरोध करणारे प्रस्थापितांचे प्रतिनिधी व प्रवक्ते यांना पैसा, प्रतिष्ठा, दमनयंत्रणा, सामाजिक संस्था व सांस्कृतिक परंपरा यांचे पाठबळ आहे. म्हणून परिवर्तनवादी शक्तींनी आपले सर्व बळ एकवटल्याखेरीज या झगड्यात यश मिळण्याची शक्यता नाही, याचा पदोपदी त्यांना अनुभव येतो. म्हणून प्रत्येक संघटनेचे नेते व कार्यकर्ते अंतर्गत एकात्मतेचा आग्रह धरतात, व्यापक एकजुटीचे वा आघाडीचे स्वागत करतात, पण प्रत्यक्ष वास्तवाकडे नजर टाकली तर अगदी वेगळे चित्र दिसते.

राजकीय पक्ष, श्रमिक संघटना, पुरोगामी सामाजिक संस्था या सर्वांच्या नित्यनैमित्तिक कार्यात एकजुटीचा अभावच दिसून येतो. राजकीय पक्षात वारंवार फूट पडते. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व वाङ्मयीन क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्था गटबाजीने ग्रासल्या जातात. संसदबाह्य कार्य करणाऱ्या संघटना पाहिल्या तर त्यांच्यातील मतभेद विकोपाला जाऊन त्यांना एकत्र काम करणे अशक्य होऊन बसते. विचारांच्या पातळीवर ऐक्याची ओढ आणि व्यवहारात अलगतावाद, फुटीरपणा आणि दुही यांचे प्राबल्य असा विसंवाद का निर्माण व्हावा, या प्रश्नाची अधिक खोलात जाऊन चर्चा करण्याची आवश्यकता आहे. या फुटीरपणाची कारणमीमांसा करताना प्रथम येथील सामाजिक वास्तवातील गुंतागुंतीची वस्तुनिष्ठ दृष्टीने उकल करावयास हवी. केवळ काही प्रमुख व्यक्ती, पक्ष वा संघटना यांच्यातील दोषांची व उणिवांची चिकित्सा करून या प्रवृत्तीचे उच्चाटन करता येणार नाही. याचा अर्थ असा नाही की, व्यक्तींचे दोष किंवा संघटनेतील उणिवा यांच्यामुळे काही कार्यहानी होत नाही. पण फक्त त्यांच्यावरच लक्ष केंद्रित केले, तर त्यामधून काही हाती लागणार नाही; कारण फुटीरपणाची ही प्रवृत्ती सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत पसरलेली आहे. तेव्हा आपल्या सामाजिक वास्तवात अशा काही गोष्टी असल्या पाहिजेत की, ज्यांच्यामुळे फुटीरपणाला खतपाणी मिळते, दुहीची बीजे पेरली जातात. त्यांच्यावर सतत प्रहार करून त्या नष्ट करता आल्या तर एकजूट साधण्याचे कार्य पुष्कळच सोपे होईल.

आज सर्वच उठसूठ समग्र क्रांतीची भाषा बोलत असतात. मग परिवर्तनवादी कोण आणि परिवर्तनविरोधी कोण या प्रश्नाचा निर्णय आपल्याला निःसंदिग्धपणे करता आला पाहिजे. शोषित व पददलित लोकसमूहांचे दास्य, दैन्य व दारिद्र्य नष्ट करायचे असेल तर, प्रचलित समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले पाहिजे; आणि त्यासाठी सर्वसामान्य कष्टकरी जनतेला कधी ना कधी संघटितपणे निर्णायक संघर्ष करावा लागेल अशी ज्यांची धारणा असते, त्या बरोबरच जनतेत अशा जाणिवा व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी जे सम्यक् दृष्टीने व समर्पणशील वृत्तीने प्रयत्नशील असतात त्यांनाच परिवर्तनवादी म्हणणे उचित होईल. अनेक जाती जमाती, भाषा, धर्म, पंथ यांनी बनलेल्या भारतासारख्या खंडप्राय देशात सर्वसामान्य लोकांच्या जीवनसरणीत नुसती विविधताच नव्हे, तर फार मोठी विषमताही आहे. त्यांच्यात 'एकात्मता' जोपासणे आवश्यक आहे. त्यासाठी समाज प्रबोधनकर्त्यांनी एकजूट झाले पाहिजे.

१६) उतारा वाचल्यानंतर आपणास खरे 'परिवर्तन विरोधी कोण आहेत' असे वाटते?

१) प्रतिगामी विचारांचे लोक
२) प्रस्थापित लोक
३) फुटीरतावादी लोक
४) समग्र क्रांतीची भाषा करणारे लोक

१७) परिवर्तनवादी संघटनांना अपयश येण्यामागचे अचूक कारण कोणते?

१) व्यक्तिगत स्वार्थ
२) इतस्ततः विखुरलेल्या संघटना
३) व्यक्तींचे दोष किंवा संघटनेतील उणिवा
४) अलगतेची प्रवृत्ती

१८) लेखकाच्या मते 'खरा परिवर्तनवादी' कोणाला म्हणावे?

१) समन्वयशील वृत्ती असलेला.
२) सम्यक व समर्पणशील वृत्तीने प्रयत्नशील असलेला
३) संघटनशील वृत्तीचा
४) एकजूट करण्यात प्रयत्नशील असलेला

१९) परिवर्तनवादी चळवळींमध्ये एकजूट होण्यासाठी अचूक उपाय कोणता?

१) विविध चळवळींचे ऐक्य घडवून आणावे.
२) संघटनात्मक एकजूट दाखवून संघर्ष करावा.
३) फुटीरतावादी प्रवृत्तीवर सतत प्रहार करून एकजुटीचे महत्त्व वाढवावे.
४) पक्ष किंवा संघटना यांच्यातील दोष व उणिवा घालवून चळवळ उभारावी.

२०) परिवर्तनवादी संघटनांना यश येण्यासाठी काय उपाय केला पाहिजे?

१) परिवर्तनवादी शक्तींची एकजूट झाली पाहिजे. २) प्रस्थापितांना विरोध केला पाहिजे.

३) फुटीरतावाद्यांना सोडून द्यावे. ४) संघटितपणे संघर्ष करावा.

**※ खालील उतारा वाचा व त्यावरील प्रश्न क्र. २१ ते २५ सोडवा.**

मानवी विकासाचा मार्ग श्रद्धा आणि तर्क यांच्या संघर्षातून जाणारा आहे. बुद्धी आणि मन, आणि प्रचार, नवता आणि परंपरा यांच्यातील लढ्यातूनच एकविसावे शतक उगवले व आजच्या विकसित अवस्थेपर्यंत येऊन पोहोचले आहे. परंपरा व श्रद्धा स्थितिवादी तर विचार व तर्क गतिवादी असतात. स्थितिवाद समाजाला एका जागी दीर्घकाळपर्यंत रोखून धरणारा असतो तर विचार ती बंदिस्त स्थिती मोडून काढणारा असतो.

हा संघर्ष कायम चालणारा व समाजाला अखंडपणे अस्वस्थ करत राहणारा आहे. एक गोष्ट मात्र महत्त्वाची आणि खरी. या संघर्षात उशिरा का होईना पण विचारच आजवर विजयी होत आला आहे. समाजाच्या विकासाची तऱ्हाच अशी की तो प्रथम स्थितीबाहेर एक नवे व स्वतंत्र पाऊल टाकतो. त्याभोवती संरक्षक व्यवस्था उभी होण्याची काही काळ वाट पाहतो. यथावकाश कधी शांतपणे तर कधी लढाऊपणे तो स्थितीबाहेर येऊन पुढे जातो. दरवेळी त्याचे पाऊल असे पुढे गेलेलेच इतिहासाने पाहिले आहे.

कधीतरी परंपरा वरचढ होते आणि ती त्याला अडवण्याचा प्रयत्न करते. ग्रीकांची अशी अडवणूक प्रथम रोमनांनी व नंतर ख्रिश्चन धर्माने, अरबांची इस्लमाने तर भारताची वैदिक धर्माच्या परंपरांनी केली. या अडवणुकीतून प्रथम युरोप, नंतर भारत व चीन बाहेर पडले. अरब जगत या पुढाकारात अजून बरोबरीने सहभागी झाले नाही. स्थितिवादाच्या बाजूने धर्मसत्ता, आपल्या आयुधांनिशी उतरते तर परिवर्तनाची बाजू ज्ञान, विज्ञान, विचार व तर्क लढवत असते.

जगातले सारे समाज सारखेच नाहीत. त्यांची स्थिती वा गतीही सारखी नाही. त्यामुळे येणारे परिवर्तन समाजपरत्वे वेगळे असते. काही समाज लवकर प्रगती पावतात तर काहींचा स्थितिवाद दीर्घकाळ टिकतो. जिथे श्रद्धा बळकट तिथे ही गती कमजोर तर जिथे विचार सामर्थ्यशाली असतो तिथे तीही बलशाही असते. मात्र, दोन्ही जागी संघर्ष अटळ आहेत.

समाजाच्या प्रत्येक अवस्थेत काही ताकदवान वर्गांचे हितसंबंध दडलेले असतात. येणारे परिवर्तन त्यांच्या हितसंबंधांना बाधा आणत असते. मग ते वर्ग या परिवर्तनाला साऱ्या शक्तीनिशी विरोध करतात. परिवर्तनाच्या शक्ती त्या तुलनेत दुबळ्या असतात. शिवाय त्या बहुधा संघटितही नसतात. कारण परिवर्तनाची कळ अनेकदा एकेकट्या संशोधकाच्या, विज्ञानवाद्याच्या वा समाजाच्या पुरोगामी नेत्याच्या हाती असते. त्यांच्या मागे समाजाच्या लहानसाच भाग असतो आणि धर्मसत्तेसह साऱ्या सत्ता त्यांना प्रतिकूल असतात. परिवर्तनाची लढाई त्यामुळेच दीर्घकाळ चालणारी व मंद गतीने पुढे जाणारी असते. मात्र, तिची दिशा विजयाचीच असते.

युरोपात ही लढाई विज्ञानाने लवकर, १५ व्या शतकाच्या अखेरीस जिंकली व आपली वाटचाल गतिमान केली. आपण मात्र मागे रोहिलो. चीनमध्ये व रशियात धर्म व धर्माच्या श्रद्धा–दोन्ही मार्क्सवाद्यांनी मोडून काढले. भारतात हे युद्ध संपले नाही. प्रसंगी धर्माचे संतही सुधारणांच्या बाजूने झाले. पण श्रद्धांची बळकटी कायम राहिली. आताचे राजकारण पुन्हा धर्मांची मंदिरे बांधण्याच्या मागे लागले असल्याने येथील विज्ञान बरेचसे पुस्तकात व काहीसेच जीवनात राहील अशीच शक्यता मोठी आहे.

२१) विज्ञान बरेचसे पुस्तकात व काहीसेच जीवनात राहील अशीच शक्यता मोठी आहे, असे लेखकाला का वाटते?

१) जगातले सारे समाज सारखे नाहीत.

२) समाजाच्या प्रत्येक अवस्थेत काही ताकदवान वर्गाचे हितसंबंध दडलेले असल्याने.

३) परिवर्तनाची लढाई दीर्घकाळ चालत असल्याने.

४) आताचे राजकारण पुन्हा धर्माची मंदिरे बांधण्याच्या मागे लागले असल्याने.

२२) कोणत्या लढ्यातून एकविसावे शतक उगवले?

अ) बुद्धी आणि मन
ब) नवता आणि परंपरा
क) धर्म आणि श्रद्धा
ड) विचार व तर्क

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) आणि (क) बरोबर
२) फक्त (अ) आणि (ब) बरोबर
३) फक्त (क) आणि (ड) बरोबर
४) फक्त (ब) आणि (क) बरोबर

२३) स्थितिवादाच्या संदर्भात खालीलपैकी कोणता पर्याय अचूक आहे ते सांगा.

अ) परंपरा व श्रद्धा या स्थितिवादी असतात.
ब) स्थितिवादाच्या बाजूने धर्मसत्ता, आपल्या आयुधांनिशी उतरते.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) बरोबर
२) फक्त (ब) बरोबर
३) (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर
४) (अ) आणि (ब) दोन्ही चूक

२४) प्रस्तुत उताऱ्यास कोणते शीर्षक योग्य ठरेल?

१) विज्ञान आणि मानवी विकास
२) धर्म आणि श्रद्धा
३) नवता आणि परंपरा
४) स्थिती आणि गती

२५) खालील विधाने लक्षात घ्या व योग्य पर्याय निवडा.

अ) ग्रीकांची अडवणूक प्रथम ख्रिश्चनांनी व नंतर रोमनांनी केली.
ब) चीनमध्ये व रशियात धर्म व धर्माच्या श्रद्धा दोन्ही मार्क्सवाद्यांनी मोडून काढली.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) चूक (ब) बरोबर
२) फक्त (ब) चूक (अ) बरोबर
३) दोन्ही विधाने चुकीची आहेत
४) दोन्ही विधाने बरोबर आहेत

❊ **पुढील उतारा वाचून प्रश्न क्रमांक २६ ते ३० सोडवा :**

२०20 साल आले तेच कोविड – १९ चे आव्हान घेऊन. संपूर्ण जगाला हादरवून टाकणाऱ्या या विषाणूने दीर्घकाळच्या टाळेबंदीची ओळख करुन दिली. कधी नव्हे ते शाळा, कार्यालये, वाहतूक, धार्मिक–राजकीय कार्यक्रम, लग्नसमारंभ, क्रीडा स्पर्धा सगळेच ठप्प झाले. विज्ञान तंत्रज्ञानाने वेगवान झालेल्या जगाची गती करोनाने क्षीण केली. या आव्हानाचा सामना करण्यासाठी सर्वच देशांतील राज्यकर्त्यांचा कस लागला हे खरे; मात्र या संकटकाळात जगाला महिलांच्या नेतृत्वाची, त्यांच्या ध्येयधोरणांची, व्यापक दृष्टिकोनाबरोबरच संवादकौशल्य आणि त्यांच्या प्रेरक शब्दांची, कर्तृत्वाची नव्याने ओळख झाली. उदा. न्यूझीलंडच्या पंतप्रधान जेसिंडा आर्डर्न आणि जर्मनीच्या चॅन्सेलर अँजेला मर्केल. या दोघींचा या करोना संकटाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि त्यांनी या आपत्तींचा सामना करण्यासाठी उचललेली पावले, त्यासाठी आपल्या देशवासीयांशी साधलेला संवाद, त्या संवादातून या संकटाशी लढण्याचा दिलेला विश्वास याचे कौतुक सर्वत्र झाले. राजकीय नेत्यांव्यतिरिक्त संशोधन क्षेत्रातील स्त्रियांनीही या काळात महत्त्वाचे काम केले, वेळोवेळी मते मांडून समाजमनात शहाणीव पेरली.

स्त्रीप्रश्नांविषयी सदैव जागरूक अशा ब्रिटिश राजकारणी इव्हेट कूपर यांनी स्त्रियांच्या वक्तृत्वाचा पाठ समोर ठेवला आहे. 'शी स्पीक्स' या पुस्तकातून त्यांनी जगभरातल्या ४० स्त्रियांची भाषणे, त्यांची मते, त्यांचा दृष्टिकोन आणि त्यामुळे बदललेली स्थिती यांचा ऊहापोह केला आहे.

स्त्रियांनी जेव्हा जेव्हा आवाज उठवला तेव्हा तेव्हा काही क्रांतिकारक घटना घडल्या. मात्र अनेकदा त्यांचे आवाज दडपण्यात आल्याचाच इतिहास आहे.

स्त्रियांनी बोलू नये यासाठी त्यांना धमकावले जाते, प्रसंगी त्यांच्यावर हल्लेही होतात, कधी अत्याचार होतो किंवा अगदी त्यांना संपवण्याचाही प्रयत्न केला पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना त्यांच्या हक्कांसाठी, कधी त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी आवाज उठवावा लागलाच, परंतु कधी संपूर्ण मानवजातीला ऱ्हासातून वाचवण्यासाठीही बोलते व्हावे लागले. 'शी स्पीक्स' मध्ये दोन हजार वर्षांपूर्वी बाउडिका या ब्रिटिश राणीने सैनिकांना उद्देशून केलेल्या भाषणापासून जागतिक तापमानवाढीबाबत ग्रेटा थुनबर्गने केलेल्या भाष्यापर्यंत, अशी भूत–वर्तमानकालीन स्त्रीशहाणीव वाचायला मिळते. राजकीय, क्रीडा, मनोरंजन अशा विविध क्षेत्रांतल्या स्त्रियांची भाषणे यात आहेत. या स्त्रियांचे शब्द महत्त्वाचे आहेत, त्यांची भाषणे महत्त्वाची आहेतच, शिवाय त्यांचे मार्गही प्रेरक आहेत. स्त्रियांना अधिक बळ देणारे आहेत.

सौदी अरेबियात स्त्रियांच्या वाहन चालविण्याच्या हक्कासाठी मानल अल–शरीफ यांनी चळवळ उभारली. मात्र या चळवळीतील अनेक स्त्रिया आज तुरुंगवासात आहेत. जागतिक हवामान बदलाबाबत ग्रेटा थुनबर्ग हिने पृथ्वी व पर्यावरण वाचवण्यासाठी जगाला साद घातली, तर नोबेल पारितोषिक विजेत्या वांगारी मथाई यांनी जंगल वाचविण्यासाठी अनेक अत्याचार सहन केले. दुर्दैवाने, हिंसाचार आणि धमक्यांचा अनुभव आणि स्त्रियांचा आवाज शांत करण्याचा प्रयत्न आजही सुरूच आहे. म्हणूनच इटली आणि ऑस्ट्रियामधील महिला मंत्र्यांना धमक्या मिळाल्याने गेल्या वर्षी पोलीस संरक्षण घ्यावे लागले. या सगळ्यांची भाषणे, त्यांची मते पुस्तकात दिली आहेत. भारतातील कविता कृष्णन यांचे दिल्लीतील 'निर्भया' ला न्याय मिळवून देण्यासाठी आवाहन करणारे भाषणही पुस्तकात वाचायला मिळते.

२६) 'करोना' आपत्तीचा सामना करण्यासाठी, देशपातळीवर पाऊले उचललेल्या स्त्रिया

अ) ग्रेटा थुनबर्ग आणि जेसिंडा आर्डर्न
ब) इव्हेट कूपर आणि अँजेला मर्केल
क) मानल अल–शरीफ आणि वांगारी मथाई
ड) जेसिंडा आर्डर्न आणि अँजेला मर्केल

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त ब बरोबर अ,क, ड चूक
२) फक्त ड बरोबर क, ब, अ चूक
३) फक्त क बरोबर अ,ड, ब चूक
४) फक्त अ बरोबर ब,क, ड चूक

२७) 'शी स्पीक्स' या ग्रंथांचा विषय आहे.

अ) 'कोविड' चे आव्हान
ब) इव्हेट कूपरचे चरित्र
क) सैनिकांची स्थिती
ड) स्त्रियांनी उठवलेला आवाज

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त क बरोबर अ,ब , ड चूक
२) फक्त ब बरोबर क, ड, अ चूक
३) फक्त ड बरोबर अ,ब, क चूक
४) फक्त अ बरोबर ब,क, ड चूक

२८) कर्तृत्ववान असलेल्या महिलांची ही भाषणे आणि त्यांनी स्वीकारलेले मार्ग

अ) स्त्रियांचे मनोबल खचवणारे आहेत
ब) स्त्रियांचे आत्मबल जागृत करणारे आहेत
क) स्त्रियांच्या दुर्बलतेला खतपाणी घालणारे आहेत
ड) स्त्री शहाणी व उजागर करणारे आहेत

**पर्यायी उत्तरे :**

१) ब आणि ड बरोबर बाकी सर्व चूक
२) अ आणि ब बरोबर बाकी सर्व चूक
३) ब आणि क बरोबर बाकी सर्व चूक
४) क आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

२९) करोनाच्या संकटकाळात जगाला महिलांच्या नेतृत्वाची, कर्तृत्वाची आणि ...........ची ओळख झाली. 'त्व' हे विशेषण वापरुन आणखी कोणता शब्द सदर परिच्छेदात आलेला आहे ?

अ) मातृत्व – महत्त ब) स्त्रीत्व क) पूर्णत्व ड) वक्तृत्व

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक २) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

३) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक ४) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

३०) सदर उताऱ्याचा आशय काय आहे ?

अ) भाषणबाजी ब) वायफळ बडबड

क) कर्तृत्त्ववान स्त्रियांचे वक्तृत्व ड) करोनाचा कहर

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ बरोबर ब, क, ड चूक २) ब आणि ड बरोबर अ आणि क चूक

३) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक ४) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

* **पुढील उतारा वाचून त्यावरील ३१ ते ३५ प्रश्नांची उत्तरे लिहा.**

एक जुनं प्रेमपत्र माझ्या वाचण्यात आलं. त्यातील प्रियकर आपल्या प्रियतमेला लिहितोय, 'आजचा दिवस हा समस्त विश्वातील पावित्र्याने आणि काव्याने भरलेला आणि भारलेला आहे. सगळ्या उत्सव, सणांनी भारलेला. वर्षभरातील ३६५ तेजस्वी सूर्य मी आज तुला अर्पण करतोय. या तुझ्या जन्मदिवशी, तुझ्या अवघ्या अस्तित्वाला या अर्धशतकातील अन् पुढच्या पूर्ण शतकातील सगळे सूर्य अर्पण ! सगळे ऋतू, सगळे रंग अन् सगळे सुगंध तुझ्या अस्तित्वाला अर्पण !'

पत्र वाचताना लक्षात येतं की प्रियतमेचा आज जन्मदिवस आहे. या अत्युत्कट प्रेमपत्राची तारीख आहे ३१ ऑगस्ट १९६७. पत्र लिहिणारी प्रेमी – प्रसिद्ध चित्रकार इमरोज. प्रियतमेचं नाव अमृता प्रीतम. पंजाबी साहित्यातील स्त्रीचा दमदार आवाज म्हणजेच ज्ञानपीठ पद्मविभूषण अमृता प्रीतम ! अमृताजी आज नाहीत. इमरोजजी आहेत. त्यांच्या जगावेगळ्या उत्कट प्रेमाबद्दलची पुस्तकं अन् कविता, आपल्याला एका विलक्षण, अद्भुत जगात घेऊन जातात.

हे पत्र वाचल्यानंतर मी इमरोजजींशी संवाद केला. विचारलं, '३१ ऑगस्ट म्हणजे अमृताजींची जयंती. तुमच्या काय भावना आहेत आज ?' प्रश्न पूर्ण न होऊ देताच ते उत्तरले – 'जयंती त्यांची, जे हयात नसतात. अमृता तर इथेच आहे. ती कुठे जाईल ? माझ्याशिवाय ती राहू शकत नाही. मी घरभर फुले मांडणार आहे. तिला फार आवडतात ना !' मी त्यांना त्यांचं १९६७ चं प्रेमपत्र वाचलं हे सांगितलं. तेव्हाचं प्रेम, ती ओढ, याबद्दल आज काय वाटतं हे विचारलं. तर ते म्हणाले, प्रेम आणि त्याबद्दलची ओढ, प्रेमाच्या शोधयात्रेत तिला मिळालेली अनमोल भेट ! ४५ वर्षांच्या प्रेमाच्या सहवासात त्यांनी कधीच एकमेकांना 'का ?' असं विचारलं नाही. इमरोज म्हणतात, 'खरं प्रेम प्रश्न उभे करीत नाही.' अमृता कधीच इमरोजला सोडून जेवत नाही. इमरोज बाहेरून आले की अमृता गरम रोटी करणार. स्वयंपाकघरातील ओट्याजवळ इमरोजना उभे करून स्वतःच्या हाताने एक गरम रोटी खाऊ घालणार. उरलेलं जेवण दोघे पुन्हा डायनिंग टेबलजवळ करणार. हा क्रम ४५ वर्षांच्या सहवासात कधी चुकला नाही. ती फार प्रेमळ व फारच साधी बाई. या अजरामर प्रेमकथेतील प्रसंग ऐकले, वाचले की वाटतं, प्रेमाचा खरा अर्थ केवळ त्यांनाच समजला आहे. अमृताजी संसद–सदस्य होत्या. ती ६ वर्षे संसदेत त्यांना कारने सोडल्यावर इमरोज कारमध्ये बसून राहत; अगदी इतर खासदारांच्या ड्रायव्हरसारखे ! स्वतःच्या अस्तित्वाची दखल इतरांना घ्यायला लावण्याचा त्यांचा स्वभावच नाही. कुणा पुरुषानं इतकं निरहंकारी, निरपेक्ष प्रेम केलेलं मी तरी अद्याप पाहिलेलं नाही. स्त्रियांनी असे प्रेम केल्याचे दाखले बरेच सापडतात. इमरोज म्हणतात, 'प्रेम म्हणजे काय मला नाही ठाऊक, पण आमच्या नात्यात एकमेकांना समजून घेणं होतं. जोपर्यंत आपल्यातला 'मी' जागा आहे तोपर्यंत आपला जोडीदार हा एक दुसरा माणूस असतो. तू–मी विरघळून 'आपण' झालो की अहंकार उरत नाही. मग वाद, प्रश्न, भांडणे कशी होणार ? स्त्रीला शरीराच्या पलीकडेही अस्तित्व असतं; पण खूपशा पुरुषांना हे कळतच नाही.

दोन सर्जनशील, उत्कट, कलावंतांच सहजीवन इतकं विलोभनीय होतं ! एवढं अनाग्रही निरहंकारी आणि सहज प्रेम करणारा हा पुरुष पाहून डोळे विस्फारून जातात.

३१) प्रियकराने आपल्या प्रियतमेला जन्मदिवशी कोणत्या शुभेच्छा दिल्या ?

अ) वर्षभरातील ३६५ सूर्य तुला अर्पण करणार नाही.
ब) समस्त विश्व तुझ्या पावित्र्याने न भरो.
क) सारे ऋतू–रंग–सुगंध तुझ्या अस्तित्वाला अर्पण.
ड) तुला काव्यस्फूर्ति न लाभो.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक
२) फक्त क बरोबर
३) फक्त ब आणि क बरोबर
४) फक्त ड बरोबर बाकी चूक

३२) जयंती कोणाची साजरी केली जाते ?

अ) जे हयात असतात त्यांची
ब) जे जन्मास येणार आहेत त्यांची
क) एखाद्याच्या जन्मदिवशी
ड) एखाद्याच्या मृत्यूनंतर ज्याचा जन्मदिवस येतो त्या व्यक्तीची.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक
२) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक
३) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक
४) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

३३) अमृता प्रीतमच्या शोधयात्रेत तिला मिळालेली अनमोल भेट कोणती ?

अ) इमरोज
ब) संघर्षयुक्त सहवास
क) स्वयंपाक घरातील ओट्याजवळ उभं राहण्याची शिक्षा
ड) द्वेष करणारा प्रियकर

**पर्यायी उत्तरे :**

१) अ आणि ब बरोबर बाकी चूक
२) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक
३) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक
४) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक

३४) इमरोजच्या मते प्रेम म्हणजे काय ?

अ) स्त्रीला शरीराच्या पलीकडे अस्तित्व नसणे.
ब) तू–मी विरघळून एक होणे आणि अहंकार गळून पडणे.
क) एकमेकांना समजून न घेणे.
ड) आपल्यातला 'मी' सतत जागा ठेवणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ आणि ब बरोबर
२) फक्त ब आणि ड बरोबर
३) फक्त ब आणि क बरोबर
४) फक्त ब बरोबर, अ, क, ड चूक

३५) उताऱ्याला योग्य शीर्षक कोणते ठरेल ?

अ) समस्त विश्वातील प्रेमिक
ब) सर्जनशील सहजीवन
क) उत्कटतेचा अभाव
ड) अहंकार

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक
२) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक
३) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक
४) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक

***	पुढील उतारा वाचून त्यावर आधारित असलेले प्रश्न क्रमांक ३६ ते ४० ची उत्तरे लिहा.**

मी सतत चिंतन करीत असतो, गाभा शोधीत असतो तेव्हा मला जाणवते, युवासागराला आपल्या भव्य शक्तीचे भान अद्याप झालेले नाही! या ढगांना आपल्या लपलेल्या विद्युल्लतेचा पत्ता नाही, अंदाज नाही. या कृष्ण–गेघांना कळत नाही की करंगळीवर क्षितिज पेलणारा कृष्णसुद्धा याच वयाचा होता. याहूनही लहान होता ! ज्याचे ध्यान आपल्या ध्येयाशी एकटक निगडित झाले आहे तो युवा !

दररोज मी स्वतःला शोधीत असतो. कधीकधी मी एकाकी असतो. जखम दिसत नाही, पण घायाळ असतो. अशा एकाकीपणात मला अंकुर फुटतात. मी स्वतःविरुद्ध माझ्यापाशीच तक्रार करीत असतो. युवा तो असतो, जो इतरांविरुद्ध नव्हे, तर स्वतःविरुद्ध स्वतःजवळच तक्रारी मांडीत असतो. मी ते दुःख पाहिले. माझ्याजवळ इतकी ताकद होती. मग मी पुढे का सरसावलो नाही ? माझ्यात करुणेची, प्रेमाची शक्ती होती तर काल मी पळून का गेलो ? का त्या प्रसंगाला सामोरा गेलो नाही ? ही अस्पृश्यता, विषमता, अज्ञान, दारिद्र्य, लाचारी मी सहन करू शकत नाही. मग जीवनाच्या रणांनगणाकडे जाताना माझी पावले का अशी रेंगाळतात ? कृतीच्या क्षणी मी का माघारी वळतो ? जो लाचारीने शरमिंदा होतो, तो युवा. आपल्या या लाचारीवर तो एकान्तात अश्रू ढाळतो. ते क्षण त्याला बळ देत असतात, अगतिकतेच्या पलीकडे झेपावण्याचे, उषःकालापूर्वी घनदाट अंधकार जरूर असतो, पण प्रभातकाल सन्निध असल्याची चाहूल अंधार देत असतो. युवा तो, जो जगातले अंधारलेले कोपरे उजळवतो. त्याचबरोबर आपल्या हृदयातला कोपराही दीप्तिमान करतो. परिस्थितीचे लगान खेचून जो तिला काब ूत आणतो तो युवा. (पण साहसालाही एक अट असते. लक्ष्मणरेषा आखण्याची. तरुणाईने आपल्या जीवनात ही लक्ष्मणरेषा आखून घेतली नाही म्हणून ही शक्ती विध्वंसनात, उलथापालथीत कामी येत आहे. आपल्या युवा शक्तीला त्यांनी योग्य रस्त्यावर हाकारले नाही. कधी छोट्या छोट्या प्रकल्पात, कार्यक्रमात, इवल्याशा क्रांतीत ती तो उधळून टाकतो. पण, चहाच्या किटलीतल्या वाफेने जनतेचे रथ चालत नसतात !

आजची युवा पिढी आहे केवळ स्पेक्टेटर जनरेशन प्रेक्षक पिढी, देखू पिढी ! ती केवळ पाहते आहे – कुठे कशी क्रांती कधई घडून येते. जेथे बांधून घ्यावे लागेल, कार्यमग्न व्हावे लागेल असे राजकारण तिला नको ! कार्यक्रम असा असावआ की ज्यात बांधिलकी (कमिटमेंट) सुद्धा असावी आणि सहभागही (इनव्हॉलमेंट) असावा, जेव्हा कुणी माझ्याकडे स्वाक्षरी मागायला येतो तेव्हा मी हैराण होतो. युवक तो आहे, जो इतरांपासून संदेश या स्वाक्षरी मागीत नसतो. तो घटनांवर आणि क्षणावर आपली स्वाक्षरी उमटवितो !

आता काय आहे, काय नाही याचे चऱ्हाट आणि रडगाणे बंद झाले पाहिजे. ती पिढी अशी आहे, हा धर्म असा आहे, सोडून द्या या गोष्टी. धर्माने दुनियेचे भले होईल यावर भरोसा ठेवायची तुमच्यावर कुणी सक्ती तर नाही ना केली ? आपसात वैर करावे असे धर्म सांगत नाही; पण त्याच्याच नावावर झगडे होत आहेत.

३६) प्रस्तुत उताऱ्यासाठी अधिक योग्य शीर्षक कोणते ?

१) जीवनाचे रणांगण
२) युवकाची बांधिलकी
३) युवा जीवनाला समाजाचे अडथळे
४) युवासागर

३७) तरुणांची शक्ती कोमत्या कार्यात वाया जात आहे ?

a) विधायक कार्यात
b) विध्वंसनात व उलथापालथीत
c) अंधारलेले कोपरे उजळण्यात
d) कृतीच्या क्षणी माघारी वळण्यात

**पर्यायी उत्तर :**

१) फक्त (a) व (b) बरोबर
२) फक्त (b) व (c) बरोबर
३) फक्त (c) व (d) बरोबर
४) फक्त (b) व (d) बरोबर

३८) युवाशक्तीची लक्षणे कोणती ?

a) परिस्थितीचे लगाम खेचून काबूत आणणारा
b) लाचारीने शरमिंदा न होणारा
c) प्रसंगांना सामोरे जाणारा
d) करुणेची, प्रेमाची शक्ती असणारा

**पर्यायी उत्तर** :

१) (a), (b), (c) सत्य
२) (b), (c), (d) सत्य
३) (c), (d), (a) सत्य
४) वरील सर्व सत्य

३९) आजच्या युवा पीढीतील दोषस्थळे सांगा.

a) प्रेक्षक पीढी व दुसऱ्यांची तक्रार करणारे.
b) बांधिलकी नसलेला व दुःखी
c) सहभाग नसणारे व समस्यांपासून पळणारे.
d) घटनांवर व क्षणांवर स्वाक्षरी न उमटविणारा.

**पर्यायी उत्तर** :

१) फक्त (a), (b), (c) बरोबर
२) फक्त (c), (d), (a) बरोबर
३) फक्त (b), (c), (d) बरोबर
४) वरील सर्व बरोबर

४०) युवा कुणाला म्हणावे ?

१) एकाकी व तरुण असतो त्याला
२) जगाचे भान असलेला
३) आपल्या भव्य शक्तीचे भान झालेला
४) वयाच्या २५ वर्षापर्यंतच्या तरुणाला

* **पुढील उतारा वाचून प्रश्न क्रमांक ४१ ते ४५ या प्रश्नांची उत्तरे द्या.**

आधुनिक जगातील सत्तेच्या वर्चस्वाची उतरंड हा कळीचा मुद्दा बनते. तंत्रज्ञानाचे श्रेष्ठत्व, आधुनिकता वर्चस्व गाजवते. शत्रुला अत्याधुनिक तंत्रज्ञानापासून वंचित ठेवायचे, अन् मग आपल्या अटी एकतर्फी लादायच्या. दोन हजार वर्षापूर्वी चिनी तत्त्वज्ञानी 'सून त्झू' याने युद्धशास्त्राचा एक महत्त्वाचा नियम सांगितला आहे. युद्धामध्ये शत्रुच्या मानवी शक्तीचे खच्चीकरण करण्यापेक्षा शत्रुसैन्याचे मनोधैर्य खच्ची करणे जयासाठी अधिक महत्त्वाचे आहे. मनाने हरलेले सैन्य सहज पराभूत होऊ शकते. हे सांगताना त्याने जणू विसाव्या शतकातील तंत्रज्ञानाच्या वर्चस्वाला डोळ्यांसमोर ठेवले असावे. आखाती युद्धात वापरली गेलेली इलेक्ट्रॉनिक शस्त्रे अन् क्षेपणास्त्रे यांचा एकत्रितपणे केला गेलेला मुबलक वापर पाहणे हे युद्धशास्त्राच्या माहितगारांना डोळ्यांना मेजवानी मिळाल्यासारखे होते. जणू एकविसाव्या शतकात युद्ध झाले, तर जगाच्या रंगमंचावर काय दिसेल याची झलक पाहायला मिळाली. क्षेपणास्त्रे, इलेक्ट्रॉनिक शस्त्रे, माहिती–तंत्रज्ञान हे जणू त्यावर प्रमुख भूमिका निभावणार आहेत.

आपल्या देशात 'तंत्रज्ञान' म्हणजे अजूनही काळ धूर ओकणाऱ्या उंच चिमण्या आणि कर्कश आवाज करणारी अवजड यंत्रे हेच चित्र बहुसंख्य लोकांच्या डोळ्यांसमोर उभे राहते. हे विपर्यस्त चित्र आहे. मध्ययुगामध्ये घोड्याचा लगाम शोधला गेला अन् शेतीशास्त्रात आमूलाग्र बदल झाला. त्यानंतर कित्येक शतकांन बेसामरची धातू वितळवणारी भट्टी बनली अन् मानवाने धातूला हवा तो आकार देऊन फार मोठी तांत्रिक झेप घेतली. तंत्रज्ञानामध्ये अशी काही संशोधने किंवा यंत्रे बनतात की त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग होतोच असे नाही; पण ज्ञान म्हणून ते मानवाला समृद्ध करत राहते. उदाहरण द्यायचे झाले, तर रसायनशास्त्रातील प्रक्रिया, मासे प्रजनन करतात ते शास्त्र, गवत उपटण्याचे, रोगी तपासायचे, वा इतिहास शिकवायचे, युद्धे करायचे वा थांबवायचे अशी अनेक देता येतील.

आज अधिकांश तंत्रज्ञान हे फिरत्या पट्ट्यापासून वा उघड्या भट्टीपासून दूर असते. इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश संशोधनअशा नव्या क्षेत्रांत तर शांतता आणि स्वच्छता प्रथम क्रमांकाची गरज असते. फिरत्या पट्ट्यापाशी उभी असलेली लहानसहान कामे करणारी माणसांची फौज हे चित्र कालबाह्य झाले आहे. नव्या तंत्रज्ञानाला सोबत नेण्याधी जनमानसातली ही तंत्रज्ञानाची कालबाह्य प्रतीके आधी बदलायला हवीत. तंत्रज्ञान हे तंत्रज्ञान, पचवूनच वाढते, अधिक पुढे जाते; स्वतःचा उद्धार स्वतःच करू शकते. एका अर्थाने तंत्रज्ञानातील प्रगती ही तीन टप्प्यांमध्ये एकमेकांत गुंतलेली वर्तुळाकार साखळी असते. पहिली निर्मिती अवस्था, ज्यामध्ये

एखाद्या कल्पनेचा आराखडा असतो. मग तो आराखडा सत्यात उतरवला जातो आणि प्रत्यक्ष व्यवहारात त्याचा वापर केला जातो. मग ते समाजात मिळून मिसळून जाते अन् जीवनाचा एक भाग बनते. इथे ही वर्तुळ पूर्ण होते. असे हे तंत्रज्ञान समाजात मुरले, की त्याची सवय होते आणि अधिक परिपूर्णतेकडे जाण्यासाठी नव्या कल्पना सुचतात. असे हे एकातून उद्‌भवणारे दुसरे वर्तुळ आहे. विकसित देशात या वर्तुळातील प्रत्येक टप्प्यातील वेळेचे अंतर कमी होत आहे. आपल्या देशात आपण नुकते वर्तुळ पूर्ण व्हायच्या पायरीवर पोचलेलो आहोत.

४१) प्रस्तुत उताऱ्यातील विवेचनातून कोणत्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत ?
१) तंत्रज्ञानातून शांतता व स्वच्छता निर्माण करणे. २) तंत्रज्ञान समाजात रूजले पाहिजे.
३) तंत्रज्ञानातून नवनव्या कल्पना सूचल्या पाहिजेत. ४) तंत्रज्ञानाकडे नवदृष्टीने पाहण्याची गरज.

४२) तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आरंभबिंदू कोणता ?
१) इलेक्ट्रॉनिक शस्त्रे बनविणे २) एखादी कल्पना सूचणे
३) तंत्रज्ञान समाजाच्या पचनी पडणे ४) कल्पना सत्यात उतरणे

४३) युद्ध जिंकण्यासाठी महत्त्वाचा डावपेच कोणात असू शकतो ?
१) शत्रूसैन्याचा संहार करणे २) शत्रूसैन्याच्या मानसिकतेवर आघात करणे
३) शत्रूसैन्यावर क्षेपणास्त्र डागणे ४) शत्रूसैन्याशी करार करणे

४४) प्रस्तुत उताऱ्यातील चिंतनाचे केंद्र कोणते ?
१) इतिहास २) अणूविज्ञान ३) अवजड यंत्रसामुग्री ४) इलेक्ट्रॉनिक क्षेत्र

४५) तंत्रज्ञानाच्या परिपूर्ण रूपाचा आविष्कार कोणता ?
१) तंत्रज्ञानाचा व्यवहारात वापर होणे २) तंत्रज्ञान अंगवळणी पडणे
३) तंत्रज्ञानातून नव कल्पना सूचणे ४) तंत्रज्ञान जीवनाचा भाग बनणे

Study CIRCLE

✻ **पुढील उतारा वाचा आणि त्या खाली दिलेल्या प्रश्न क्रमांक ४६ ते ५० या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

जागतिकीकरणामुळे व्यापार, बाजारपेठा, गुंतवणूक, तंत्रज्ञान, राजकीय निर्णय प्रक्रिया अशा सर्वच क्षेत्रात स्थाननिष्ठा बाजूला ठेवून विश्वसापेक्ष विचार करावा लागतो, धोरण ठरवावे लागते व निर्णय घ्यावे लागतात. जागतिकीकरणाचा मूलार्थ हा उदारीकरणाशी जोडलेला आहे. समानसंधींचा शोध घेण्यासाठी, समान प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी, परस्परांची ओझी हलकी करण्यासाठी जागतिक पातळीवर एक सहयोगी संस्थात्मक जीवन अवतरत आहे. या सहयोगी अस्तित्वाची मूल्ये लोकशाही, अहिंसा, स्त्री–पुरुष समानता, अल्पसंख्याकांविषयी आदर, दुर्बळांच्या हक्कांचे संरक्षण या दिशेने विस्तारत आहे. वांशिक, धार्मिक, तटबंद्य, भ्रष्टाचार आणि हिंसेची पाळेमुळे उखडून टाकून परस्पर सहमतीचे जीवन जगण्यासाठी राष्ट्र–राज्याच्या तटबंद्या ओलांडून एक वैश्विक समाज निर्माण होण्याकडे आपण जात आहोत. या पार्श्वभूमीवर भाषेच्या अस्मितेला प्रांतिक अस्मितेशी जखडून ठेवणे योग्य होणार नाही. उलट नव्या वैश्विक समाजरचनेची भाषा आत्मसात करून देशी भाषांचा तोंडवळा अधिक खुला, अधिक विश्वव्यापक बनवण्याचे आव्हान आपल्यापुढे उभे आहे. अशी परिभाषा (WTO चीही) नव्या मूल्यांचीही परिभाषा आहे. त्यासाठी मराठीत या नव्या मूल्यभानासकट नवे शब्दभान रुजवले पाहिजेत. अर्थ–वाणिज्य व्यवहारातील मराठीची समृद्धी या दृष्टिकोनातून वाढणार आहे. ज्या अनुदानांमुळे शेतीचा अर्थव्यवहार फुलेल–फळेल त्या अनुदानांना Green Box म्हणतात. ज्या परिस्थितीमुळे शेती उत्पादने बाधित होतील; पण शेतकऱ्यांची जीवनधारा बाधित होणार नाही यासाठी पूरक अनुदाने दिली जातील त्यांना Blue Box म्हणतात. तर ज्या अनुदानामुळे व्यापारातील निकोपताच बाधित होईल अशा अनुदानांना Amber Box म्हणतात. त्यामुळे

हिरवा कटोरा, निळा कटोरा आणि पिवळा कटोरा या शब्द प्रयोगांना आजच्या जागतिक व्यापारी जीवनाचा ताजा संदर्भ आहे. भाषेचा 'ताजबा' राखण्यासाठी असे नवे शब्द आपण घडवले पाहिजेत. त्यामुळे मराठी भाषाही समृद्ध होईल आणि मराठी जीवनही समृद्ध होईल.

संगणक, इंटरनेटच्या युगात मराठीला जागतिक स्तरावर विस्तार पावण्याच्या चांगल्या संधी निर्माण झाल्या आहेत. विकीपिडीयासारख्या जागतिक ज्ञानकोषात इतर भाषांच्या बरोबरीने मराठी भाषेतून ज्ञानसंक्रमण करण्याचे माध्यम खुले झाले आहे. या नव्या तंत्रज्ञानामुळेच मराठी वर्णमालेचा युनिकोडपद्धतीने जगभर खुला वापर सुरू झाला आहे. मायक्रोसॉफ्टने संगणकावर मराठीतून सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, माहितीची साठवणूक, व्यापारी हिशोब ठेवण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. इतकेच नाही तर ज्या शब्दांना आपण अश्लील, ग्राम्य आणि अनौपचारिक भाषाशूचितेपासून दूर ठेवले आहे अशा रासवट मराठी शब्दांचाही कोश करायला ही जागतिक कंपनी पुढे सरसावली आहे. मराठीचे शब्दकोश, मराठी–इंग्रजी शब्दकोश, शुद्धलेखनाची आज्ञावली आता संगणकाच्या पडद्यावर, इंटरनेटच्या मराजालावर उपलब्ध आहे. मराठी वर्तमानपत्रे, इंटरनेटच्या माध्यमातून जगातल्या कुठल्याही कोपऱ्यात आता वाचता येतात. वेब रेडिओ, ब्लॉग यामुळे प्रकाशकांच्या मध्यस्थीशिवाय कुणासही आपले वाङ्मय, आपले मनोगत आपल्या भाषेत व्यक्त करण्याची संधी मिळाली आहे. अन्याय–अत्याचारांना वाचा फोडण्यासाठी, सामाजिक सलोखा राखण्यासाठी, समविचारी लोकांचा संघ वाढवण्यासाठी, मराठी भाषिकाला आपल्याच भाषेतून जगभरातल्या आपल्या सहृदांशी संपर्क साधण्याची क्षमता या माध्यमांनी दिली आहे.

४६) जागतिकीकरणामुळे कोणते अडथळे पार करून वैश्विक समाज निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे?
   १) अंधश्रद्धा, अंधानुकरण, करुणा, समाजप्रेम  २) व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक
   ३) वांशिक, धार्मिक तटबंद्या, भ्रष्टाचार व हिंसा  ४) भाषा, धर्म, कला, विज्ञान

४७) विकिपिडीयामुळे कोणती गोष्ट साध्य झाली आहे?
   १) व्यापाराची माहिती देणे  २) मराठी भाषेतून ज्ञानसंक्रमण करणे
   ३) शेतमालाचा व्यापार करणे  ४) राष्ट्रीय धोरण ठरविणे

४८) प्रस्तुत उताऱ्याची मध्यवर्ती कल्पना कोणती?
   १) जागतिकीकरणातील मराठी भाषेची समृद्धी  २) भाषा आणि व्यापार
   ३) भाषा आणि सामाजिक सलोखा  ४) संगणक आणि भाषा

४९) जागतिकीकरण, व्यापार आणि भाषा याकडे लेखक कोणत्या दृष्टिकोनातून पाहातो?
   a) जागतिक व्यापाराचे लाभ  b) संगणकीय तंत्रज्ञानाचे लाभ
   c) सहयोगी संस्थात्मक अस्तित्व  d) शेतीतून होणारे लाभ
   **पर्यायी उत्तरे** :
   १) (a) व (c) बरोबर  २) (b) व (d) बरोबर  ३) (c) बरोबर  ४) (d) बरोबर

५०) भाषेच्या नाविन्यपूर्णतेसाठी लेखकाने कोणता शब्द वापरला आहे?
   a) कटोरा  b) परिभाषा  c) ताजबा  d) युनिकोड
   **पर्यायी उत्तरे** :
   १) (a) व (c) बरोबर  २) (c) व (d) बरोबर  *३) फक्त (d) बरोबर*  ४) फक्त (c) बरोबर

**❊ पुढील उतारा वाचा आणि त्या खाली दिलेल्या प्रश्न क्रमांक ५१ ते ५५ या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

कोणत्याही वस्तूविषयाचे, स्वभावाचे मूळ स्वरूप समजण्यासाठी, उत्खनन, संशोधन व मनन होणे अपरिहार्य असते. म्हणूनच गर्भित ज्ञानाविषयीची विलक्षण उत्सुकता व आत्मविश्वास पणाला लावून मनुषअयाने, सृष्टीत हजारो लाखो शोध घेतले. जिवाचे रान करीत, आकाश पाताळ एक केले. पृथ्वीचे सर्वांगीण अष्टपैलूत्वही त्याने संशोधनातून नखशिखांत निरखले. सूर्यावरील संशोधन तर त्याच्या शोधक बुद्धीची कमाल मर्यादा. तीही मानवाने पार केली. पण, चंद्रावरील मातीधोंड्यांपासून ते म्हैसूरच्या खाणीतील पिवळ्या दगडतुकड्यांचे पृथक्करण हरहुन्नरीने यशस्वी करणारा मानव, मनुष्य स्वभावाचेच मर्म व जडणघडण उकलण्यात मात्र अद्यापही असमर्थ ठरला. त्यासाठीचे सारे वैज्ञानिक प्रकल्पही कमीच पडले.

नेमके याच विषयांवर प्रदीर्घ मनन व्हायला हवे अशी श्रीरामकृष्णांची इच्छा आहे. मनुषअयाच्या मनःपटलावर क्षणाक्षणाला उमटत असणारे एकूणच बरेवाईट भावतरंग व सुप्त गुप्त असे चौरंगी विचार जसेच्यातसे बंदिस्त करून, हवे तेव्हा बोलते करता येतील का ? कारण हे विचारच त्याचा भविष्यकालीन स्वभाव रेखाटत असतात. स्वभाव परिक्षणासाठी ही पद्धती विज्ञानाच्या चौकटीत अपवादानेच चपखल बसेल. परंतु, मनुष्य स्वभावाचे जळीस्थळी असणारे हे मृगजळ, अनेकदा बुद्धी चक्रावून सोडते त्याचे काय? म्हणजेच सावध पवित्र्यानेच प्रत्येक त्रयस्थाशी बोलणे, चालणे, वआगणए आले ! न ओळखता येणारे कुणी लबाड, अहंमन्य तर कुणी आतल्या गाठी बुद्धीचे लोक समाजा पावलागणिक भेटतात. कुणाच्या बोलण्यातला स्वार्थ राईएवढा, तर कुणाच्या वागण्यात पर्वतप्राय मतलब ! सारेच मृगजळाच्या बुरख्यात लपलेले दांभिक, खोटारडे, भोंदू. याना ओळखायचे कसे हाच आत्ताच्या सामाजिक मननाचा गहन प्रश्न आहे.

श्रीरामकृष्ण म्हणतात, परिपक्व व विनयशील व्यक्तिमत्व पहाताच मन उल्हासित होते. आपलेच प्रतिबिंब आपण पहात असल्याचा सकृत आनंदही कधीकधी लाभतो तो असा. व्यक्तित्वाचे हे गुणविशेष एका दिवसात चमत्काराने घडलेले नसतात. त्यामागे आद्य विद्येची साधना, ज्ञान, तपश्चर्या व निगर्वीतेचे पाठबळ असते. कच्चे लोखंड अनेकवेळा भरपूर तापवून त्यावर हातोड्याचे शंभर प्रहार झाल्याविना, पोलादाची उत्तम प्रत तयार होत नाही. या बहुगुणी पोलादातूनच सुंदर धारदार तलवारीची तथा असंख्य जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती होते. असह्य वातावरणातून उभारलेले पोलाद, कसेही चेचा, ठोका, वाकवा, त्याचा अंत होत नाही की गुणधर्म बदलत नाही. मनुष्याचा सृजनशील स्वभावाशी मिळते जुळते वाटणारे पोलाद बघूनही, सोशिकता व सज्जड प्रयत्नवादाची मनोमन जाणीव होते.

यशस्वी जीवनही असेच पायाशुद्ध, कणखर प्रयत्नांचे फळ असते. परंतु जे सतत सुखाचाच विचार करतात. ते उच्च पदाच्या आसपासही कधी पोहोचू शकत नाहीत. अनंत यातना व प्रामाणिक कष्टांती लाभलेले सुयशही तितकेच उदात्त असते. कारण, स्वजीवन समृद्ध व आविष्कारी घडविल्याचा विनम्र स्वाभिमान त्यातून प्रत होत असतो. साऱ्या सृष्टीत भ्रमण करणारी आत्मशक्तीच तुमचे मन, स्वभाव, विचार व जीवन पोलादी व धैर्यशील बनवत असते. धडपडण्यातील जिद्द, निकोप ध्येयवाद व कर्मनिष्ठ प्रयत्न ही आत्मशक्तीचीच रूपांतरे.

५१) मानवी स्वभावाचे मूळ स्वरूप समजण्यासाठी आवश्यक असलेले घटक कोणते ?

१) पृथ्वीचे सर्वांगीण अष्टपैलूत्व जाणण्याची इच्छा
२) ज्ञानाचे उत्खनन, संशोधन व मनन होणे
३) मानवी मनाचे भावतरंग समजून देणारी शक्ती
४) स्वभाव परिक्षणाला विज्ञानाची जोड

५२) मानवाच्या शोधक बुद्धिशी संबंधित असलेली कमाल मर्यादा कोणती ?

१) म्हैसूलच्या खाणीतील पिवळ्या दगडतुकड्यांचे पृथ्थकरण
२) चंद्रावरील मातीधोंड्याचे संशोधन
३) सृष्टीतील हजारो घटकांचे संशोधन
४) सूर्यावरील संशोधन

५३) 'वैज्ञानिकृष्ट्या झालेले मानवी संशोधन अपूर्ण आहे'' असे श्रीरामकृष्णांना कां वाटते ?

१) कारण मनुष्य स्वभावाचे व जडणघडण उकलण्यात मनुष्य असमर्थ ठरला आहे म्हणून
*२) मनुष्य स्वभाव म्हणजे जळीस्थळी असणारे मृगजळ आहे म्हणून*
३) सामाजिक मननाचा प्रश्न आहे म्हणून
४) विज्ञानाने खूप प्रगती केली म्हणून

५४) मानवी स्वभावरूपी मृगजळाच्या बुरख्यात लपलेला सामाजिक गहन प्रश्न कोणता ?
   १) मनुष्य मनःपटलावर उमटत जाणारे बरेवाईट भावतरंग.
   *२) सावध पवित्र्याचे त्रयस्थाशी बोलणे वागणए.*
   ३) माणसाची लबाड अहंमन्यवृत्ती
   ४) समाजातील दांभिक, खोटारडे, भोंदू स्वभावाची माणसे ओळखायची कशी ?

५५) आपले मन–स्वभाव–विचार परिपक्व करणारी श्रीरामकृष्णांना अभिप्रेत असलेली शक्ती कोणती ?
   १) मृगजळ असलेले आंतरमन
   *२) सज्जड प्रयत्नवाद*
   ३) साऱ्या सृष्टीत भ्रमण करणारी आत्मशक्ती
   ४) अहंमन्यवृत्ती

*** पुढील उतारा वाचून प्रश्न क्र. ५६ ते ६० ची योग्य उत्तरे द्या.**

अनेक वर्षांपूर्वी 'चांदोबा' मासिकात एक गोष्ट प्रसिद्ध झाली होती. मनोहर नावाचा साहसी आणि सत्प्रवृत्त राजा असतो. तो राजा आपल्या राज्यातील दर्यावर्दी लोकांना एक आव्हान देतो. समुद्राची सीमा नक्की कुठे संपते, हे त्यांनी शोधायचे असते. त्याचप्रमाणे किनारा सोडल्यापासून लागलेल्या भूप्रदेशांचे आणि समुद्री सीमांचे नकाशेही त्यांनी बनवायचे, असा आदेश राजाने त्यांना दिलेला असतो.

ते दर्यावर्दी दीर्घकाळ प्रवास करू शकणारे एक दणकट जहाज बांधतात आणि समुद्रात उतरतात. परंतु काही दिवसांनी ते जहाज एका वादळात सापडते, फुटते आणि वाहत वाहत एका पर्वतावर जाऊन पडते. त्या पर्वताचे नाव असते श्रीकुंज. त्या वादळातून वाचलेले दर्यावर्दी त्या पर्वतावर कशीतरी गुजराण करू लागतात. बरेच दिवस जहाज परत आले नाही. म्हणून राजा मनोहर त्या दर्यावर्दींच्या शोधात दुसरे जहाज पाठवतो. त्या खलाश्यांना प्रवास करता करता वाटेत तो श्रीकुंज पर्वत लागतो. संकटातून वाचलेले दर्यावर्दी आणि त्यांच्या शोधात गेलेले खलाशी पुढे त्यांच्या प्रवासाचे नकाशे बनवितात. भारतात बनलेले ते पहिले नकाशे !

ही सत्यकथा असल्याचे सांगितले जाते. तशी ती असेलही. परंतु अवघ्या जगाचा, या पृथ्वीचा 'अधिकृत' नकाशा, समुद्री मार्ग, पर्वत, वाळवंटे, जंगले, नद्या हा सर्व भूगोल आकलन व्हायला हजारो वर्षे जावी लागली. या शतकाच्या अगदी सुरुवातीच्या काळापर्यंत आपल्या पृथ्वीच्या 'सीमा' आणि आपल्या ग्रहावरील भूप्रदेशाचे भौगोलिक आकलन माणसाला झाले नव्हते. 'भूगोल' आणि 'नकाशा' या संकल्पना शेकडो वर्षे विकसित होत गेल्या आहेत.

असेही म्हणता येईल, की भूगोलाचे, नकाशांचे भान होतहोतच माणसांची सांस्कृतिक उत्क्रांती होत गेली आहे. भूगोलाच्या ज्ञानाशिवाय साम्राज्यशाही प्रस्थापित झाली नसती, वसाहती स्थापल्या गेल्या नसत्या, भांडवलशाही विकसित झाली नसती, विविध भाषा–चालीरीती–रूढी–जीवनशैली समजल्या नसत्या. खरे म्हणजे आज आपण 'राष्ट्र' म्हणून त्या भूप्रदेशांना ओळखतो, तो 'राष्ट्रवाद' ही जन्माला आला नसता !

त्या राष्ट्रवादाच्या अनुषंगानेच आजचे राजकारण घडले आहे. युनोमधले पावणेदोनशे देश त्या भूगोल ज्ञानावरच आपल्या सार्वभौमत्वाच्या सीमा निश्चित करीत असतात किंवा त्याबद्दल वाद घालीत असतात. सर्व युद्धे–महायुद्धे झाली ती त्या सीमा ठरविण्यासाठीच. कारगिलमधील गवताचे पातेही न उगवणारा, सोळा हजार फूट उंच असलेला बर्फाळ प्रदेश असो वा इस्त्रायल–अरब देशांना जोडणारे विशाल, निर्मनुष्य वाळवंट असो, अंटार्क्टिकाच्या अथांग बर्फाळ प्रदेशात भारत, अमेरिका, रशिया, आदी देशांचे फडकणारे झेंडे असोत वा विविध सामुद्री आखातांमध्ये सापडणाऱ्या खनिज तेलांच्या विहिरी असोत – त्यांवर 'मालकी' हक्क सांगण्यासाठी भूगोलाचे, नकाशांचे ज्ञान हवेच.

५६) मासिकातील गोष्ट कशाबद्दलची होती ?
   १) मनोहर राजाची साहसी वृत्ती
   २) दर्यावर्दी जीवनातील आव्हाने
   ३) भारतातील नकाशांचा आरंभ
   ४) श्रीकुंज पर्वताची माहिती

५७) 'भूगोल' आणि 'नकाशा' या संकल्पना शेकडो वर्षे विकसित होत होत्या, कारण –
१) पृथ्वीचे क्षेत्रफळ अफाट आहे.
२) एकेका भौगोलिक घटकाच्या माहितीसोबत टप्प्याटप्प्याने आकलन वाढत गेले.
३) सर्वांना महत्त्व कळेपर्यंत अनेक पिढ्या गेल्या.
४) प्रचंड माहिती असल्याने गोळा करण्यास हजारो वर्षे लागली.

५८) भूगोलाबद्दलची जाणीव व माणसांचा सांस्कृतिक विकास परस्परांसंबंधित आहेत, कारण –
अ) भौगोलिक ज्ञानाचा आधार भूप्रदेशांवर वर्चस्व मिळवताना मिळाला.
ब) भौगोलिक ज्ञानामुळे नैसर्गिक संपत्तीचा आपल्या सुखसोयींसाठी अधिकाधिक वापर होऊ लागला.
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त अ २) फक्त ब ३) अ व ब दोन्ही ४) अ व ब दोन्हींही नाहीत

५९) जागतिक राजकारणावर भूगोलाच्या ज्ञानाचा काय परिणाम झाला ?
अ) जीवनशैलीतील साम्यभेदांच्या ज्ञानामुळे 'राष्ट्र' ही संकल्पना निर्माण झाली.
ब) आपल्या राष्ट्राच्या सीमारेषा सांभाळणे त्यामुळेच महत्त्वाचे वाटू लागले.
क) राजकारणातील घडामोडींनुसार भौगोलिक नकाशे बदलतात.
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त अ व ब २) फक्त अ व क ३) फक्त ब व क ४) फक्त अ

६०) या उताऱ्यासाठी पुढीलपैकी कोणते शीर्षक योग्य ठरेल ?
१) दर्यावर्दी भारतीय २) प्राचीन भूगोल
३) भूगोल आणि मानवी उत्क्रांती ४) भूगोल आणि राष्ट्रवाद

* **पुढील उतारा वाचा आणि त्या खाली दिलेल्या प्रश्न क्रमांक ६१ ते ६५ या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

नेहमी समंजसपणे वागणं सोपं नसतं; पण ठरवलं, तर फारसं अवघडही नसतं.

'तो नीट बोलला असता, तर मी हो म्हटलं असतं,' 'त्यानं नीट मागितलं असतं, तर मी दिलंच असतं,' या धोरणात प्रतिसाद नाही, प्रतिक्रिया आहे. समोरच्याचं वागणं बोलणं यावर आपण आपलं वागणं अवलंबून ठेवतो आणि अनेकदा आपण मनाशी आखलेल्या गोष्टी करायचं टाळतो. म्हणजेच केवळ प्रतिक्रिया म्हणून स्वतःचं वागणं बदलतो, स्वतःच्या स्वभावाविरुद्ध वागतो.

'लोक माझ्याशी चांगलं वागले, तरच मी चांगला वागेन,' हा पवित्रा सगळ्यांनीच घेतला, तर प्रथम चांगलं वागायचं कुणी? नाहीतर मग आपणही वाईट वागण्याचा, थोडा कोतेपणा करण्याचा, मन छोटं करण्याचाच पर्याय राहतो. म्हणूनच काही झालं, तरी आपण आपल्या स्वाभाविक शैलीनं वागावं. 'प्रतिक्रिया' म्हणून समोरच्याच्या पातळीवर आपण उतरू नये.

क्वचित एखाद्यावर आपण इतकं संतापतो, की त्याचा अपमान करावा, त्याला काही करून दुखवावं, हे जे मनात येतं, ते तात्पुरतं असतं. ती प्रतिक्रिया असते. तो काही आपला स्वभाव नसतो. जॉन ग्रे म्हणतात, त्याप्रमाणे अशा वेळी आपण तात्पुरतं दुष्ट होण्याचा प्रयत्न करीत असतो.

हा क्षणिक दुष्टाव्याचा मोह टाळता आला पाहिजे. हा मोह टाळता आला नाही, तर आपण त्या व्यक्तीवर या ना त्या प्रकारे सूड उगवण्याची, त्याला धडा शिकवण्याची संधी शोधत राहतो. यातली गोम अशी आहे, की राग, द्वेष हा त्या व्यक्तीबद्दलचा असतो, पण तो धुमसत राहतो आपल्या मनात. म्हणजे त्रास आपल्यालाच होतो.

मनाची शांती तर हरवतेच, पण सगळं महत्त्व दिलं जातं, त्या व्यक्तीला, जी आपल्याला अप्रिय असते, नकोशी असते, आपल्या स्वतःच्या आनंदापेक्षा त्या व्यक्तीला दुखावणं हे जास्त महत्त्वाचं ठरतं.

त्याला दुखावण्यासाठी धडपड करण्यात, त्याला धडा शिकवण्याची संधी शोधण्यात आपला वेळ आणि आपली शक्ती खर्च करण्यापेक्षा आयुष्यात इतर बरंच काही करण्यासारखं असतं, तिकडे लक्ष देणं केव्हाही शहाणपणाचं.

त्यातूनही तुम्ही अगदी कुणावर सूड उगवलात, तर तुम्हांला समाधान मिळतंही; पण तेही तात्पुरतं असतं. सुडाचं समाधान हे खरं समाधान नसतंच. आपण जे काही केलं, ते योग्य होतं का, हा प्रश्न पुढे तुम्हांला आयुष्यभर छळत राहतो.

म्हणून आपण आपल्या 'आतल्या आवाजा'चं ऐकावं. त्याची भाषा सुडाची नसते, प्रेमाचीच असते. ती समजून घ्यावी. आपली माणुसकी, आपला चांगुलपणा सोडू नये.

याचा अर्थ असा नव्हे, की एखाद्यानं आपलं कितीही नुकसान केलं असेल, आपल्याला कितीही दुखावलं असेल, तरी ते मुकाट्यानं सहन करावं. अजिबात नाही. जर आर्थिक व्यवहाराचा प्रश्न असेल, तर त्या संदर्भात आवश्यक ती कारवाई जरूर करावी. तशीच वेळ आली, तर कोर्टातही जावं; पण त्या व्यक्तीबद्दल मनात राग खदखदत ठेवू नये, आकस धरू नये.

ती व्यक्ती पुन्हा आपलं नुकसान करणार नाही, पुन्हा तिच्याकडून आपण दुखावले जाणार नाही, याची जरूर दक्षता घ्यावी. त्या व्यक्तीशी व्यवहार करू नयेत. नको असतील, तर संबंधही ठेवू नयेत. पण मनात व्यक्तिगत वैर बाळगू नये. त्याचं वाईट तर चिंतू नयेच, शक्य असेल, तर भलंच चिंतावं.

तुम्हा म्हणाल, हे इतकं संतकुळीतलं वागणं, तुम्हा-आम्हांला कसं शक्य आहे? जॉन ग्रे यांचं म्हणणं : ''स्वाभाविकपणे वागलं तर हे प्रत्येकाला शक्य आहे. कारण आपला स्वाभाविक कल हा सद्भावनेकडेच असतो.''

हे तुम्हांला पटतंय का? विचार करून पाहा. 'देव त्याचं भलं करो', हे शब्द उच्चारणं सोपं वाटतं, की 'देव त्याचं वाटोळं करो,' हे शब्द उच्चारणं सोपं असतं? स्वाभाविक काय वाटतं? कुठले शब्द उच्चारल्यानंतर आपल्याला 'छान' वाटतं? 'फरगेट ॲण्ड फरगिव्ह'या धोरणाचा फायदा का समोरच्या व्यक्तीला जितका होतो, तितकाच, किंबहुना त्याहून अधिक फायदा हा आपल्याला स्वतःला होत असतो.

तुम्ही असं (स्वाभाविक आणि म्हणूनच) छान वागता, तेव्हा पुढचे सगळे अनुचित, त्रासदायक प्रसंग तर टळतातच; पण त्यामुळे तुटलेले, तुटू पाहणारे संबंध पुन्हा जुळून येतात किंबहुना अधिक गहिरे होतात.

६१) आपण स्वतःच्या स्वभावाविरुद्ध केव्हा वागतो?

१) केवळ प्रतिक्रिया व्यक्त करतो तेव्हा.
२) केवळ दुखवण्यासाठी बोलत नाही तेव्हा.
३) स्वतःचं वागणं बदलतो तेव्हा.
४) तात्पुरतं असमाधान मिळतं तेव्हा.

६२) जॉन ग्रेच्या मते 'आपण तात्पुरतं दुष्ट होण्याचा प्रयत्न केव्हा करतो'?

१) आपण आपल्या स्वभावानुसार वागतो तेव्हा.
२) दुसऱ्याला दुखवावं असं मनात येत तेव्हा.
३) केवळ प्रतिक्रिया देतो तेव्हा.
४) मोह टाळतो तेव्हा.

६३) सुडाचं समाधान हे खरं समाधान नसतंच असे का म्हटले आहे.

१) कारण तो प्रश्न आयुष्यभर छळत रहातो.
२) कारण तो आपला बाहेरचा आवाज असतो, तो आपल्याला सूड घ्यायला सांगतो.
३) कारण त्यावेळी आपले वागणे योग्यच असते.
४) कारण त्यात शहाणपणा असतो.

६४) आपले स्वाभाविक वागणे कसे असावे?

१) वैर बाळगणारे
२) 'देव त्याचं भलं करो' असे न म्हणणारे
३) सतत बदलणारे
४) सद्भावनेकडे कल असणारे

६५) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

१) संयमाचे वागणे नको रे बाबा!
२) असद्भाव-निजखूण
३) आतला आवाज
४) एकमेका टाळीत जावे!

उत्तरे : महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब) / (गट क) २०२३

पेपर क्रमांक –१ : मराठी व इंग्रजी

# (५) मराठी उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–३ | २–२ | ३–४ | ४–२ | ५–३ | ६–४ | ७–४ | ८–४ | ९–४ | १०–३ |
| ११–२ | १२–४ | १३–३ | १४–४ | १५–३ | १६–३ | १७–४ | १८–२ | १९–३ | २०–१ |
| २१–४ | २२–२ | २३–३ | २४–१ | २५–१ | २६–२ | २७–३ | २८–१ | २९–२ | ३०–४ |
| ३१–२ | ३२–४ | ३३–३ | ३४–४ | ३५–३ | ३६–४ | ३७–४ | ३८–४ | ३९–४ | ४०–३ |
| ४१–४ | ४२–२ | ४३–२ | ४४–४ | ४५–३ | ४६–३ | ४७–२ | ४८–१ | ४९–३ | ५०–४ |
| ५१–२ | ५२–४ | ५३–१ | ५४–४ | ५५–३ | ५६–३ | ५७–२ | ५८–३ | ५९–१ | ६०–३ |
| ६१–३ | ६२–२ | ६३–१ | ६४–४ | ६५–३ | | | | | |

Study CIRCLE